
# साधना



**समाजवादाला खरी हाक खेड्यातून आहे. पण ती शुद्ध स्वरूपात आपल्याला ऐकायला येत नाही.**

प्रभाकर पाध्ये

बुधवार
२० जानेवारी १९७१
चाळीस पैसे

बुधवार, २० जानेवारी १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष । दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक । चौपन्नावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


स. न. वि. वि.

Le-Mans.
१८–१२–७०

## औद्योगिकरणाच्या मागे लागून तुम्ही हे सर्व विसरलात तर आम्हाला वाईट वाटेल....

### सौ. निर्मला पुरंदरे यांच्या पत्रातून

सध्या माझी स्थिती अस्वल आणि दरवेशी अशी झालीय. मी ज्यांच्या ज्यांच्या घरी आतापर्यंत राहिले ते ते लोक १९६७ पासून ७० पर्यंत आमच्या फ्रान्स मित्र मंडळ व पुणे मित्र मंडळ यांच्या दरवर्षीच्या योजनेप्रमाणे पुण्याला व इतर गावी जाऊन आलेले आहेत. त्यांच्या मनावर ज्या ज्या प्रतिक्रिया झाल्या त्यांना जे जे वेगळं वाटलं ते त्यांनी फोटोत टिपलं आहे. स्टेशनवरील हमाल, बैलगाडी, हातगाडीवाले, झोपडपट्टीचं जीवन, मंगळागौरी, जेवणाची पद्धत, शेती, औत, पाणी पुरवठ्यासाठी लहान लहान कालवे, मोट वगैरे अनेक दृश्यं प्रथम प्रथम मला समजेना की नेमकी ही अशीच दृष्यं यांनी छायाचित्रांचे विषय म्हणून का·

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

निवडावीत ! मग लक्षात आलं की, शवटी माणूस हा नाविन्य शोधत असतो यंत्रयुगात हातगाडी दुर्लभच की. डोक्यावर घड्यांची उतरंड घेतलेली स्त्री युरोपभर धुंडली तरी मिळेल का? रंगीबेरंगी काचेच्या बांगड्यांनी खच्चून भरलेलं दुकान, पाटांवर बसून जेवणारी कुटुंबातली माणसं हे अक्षरशः कल्पनेतही बसणारं नाही यांच्या. केवढी अपूर्वाई त्यांना !

Claudine Leroutier, Alain Chemin, Francine ही मुलं मुली ६८-६९ मध्ये पुण्याला आली होती. असेच काही फोटो त्यांनी बरोबर आणले. श्री. अच्युतराव आपटे, त्यांचं काम, ज्या ज्या घरी राहिली तेथील अगत्य, यांनी ही मुलं इतकी भारावली आहेत की विचारू नका. मी यायच्या आधी अनेकदा, अनेक ठिकाणी यांनी स्लाईड्ससह प्रवासवृत्तांत सांगितलाच आहे. मी आतापर्यंत Besancon, Grenoble, Lyon, Nantes, Belle-Ill, Brece, Bierne, Laval, Rennes, Le-Mans या ठिकाणी गेले. या सर्वच ठिकाणी, ती ती कुटुंबं पुण्यातल्या एक महिन्याच्या वास्तव्याच्या आठवणी जपून ठेवताना आढळली. 'आमच्या आयुष्यातली एक अनमोल आठवण.' असं अनेक अनेकांनी म्हणून दाखवलं. भारतात फक्त दारिद्र्य आहे, जंगली जनावरं आहेत, महाराजे आहेत या सुरात कुणीसं Belle-Ill येथील एका चर्चा मंडळात म्हटलं तर Hedwige फिसकारून म्हणते, 'फ्रान्सची झोपडपट्टी काही आपल्याला शोभा आणते का? भारतात दारिद्र्य आहे या ज्ञानाबरोबर भारतात वेरूळ अजिंठाही आहे ह्याची माहिती कशी नसते तुम्हाला?'

मी वर म्हटलं की माझी स्थिती अस्वल व दरवेशी अशी झालीय म्हणून. त्याचं कारण हेच की प्रत्येक गावी स्लाईड्स्, (काही मी बरोबर आणलेल्या, काही या मंडळींजवळच्या) भारताचा नकाशा व India 1969 यांच्या सहाय्यानं वरचेवर, सरासरी रोज एक, असे हे भारत परिचयाचे कार्यक्रम होतात.

आज रात्री १२॥ वा. अशीच Le-Mans येथील विद्यापीठातील Geography Group मधील सुमारे २०-२५ विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्रोफेसर यांच्याबरोबर हा माहितीचा कार्यक्रम करून आले आहे. माझ्याबरोबर Alain, Claudine, Francine, Annie त्यांच्या स्लाईड्स्, प्रोजेक्टर घेऊन आले होते. बऱ्याचदा येतात. वरचेवर जागरणं, वेळाची ओढाताण करून, थंडीच्या कडाक्यातही (कालचं तपमान शून्याखाली ३) ही मुलं माझ्याबरोबर येतात. भारताबद्दल इतक्या सहानुभूतीनं बोलतात, भारताच्या सुखदुःखाबद्दल इतकं कुतुहल, आत्मीयता दाखवतात की मला तर नवलच वाटतं.

अच्युतरावांचा (अच्युतराव आपटे, विद्यार्थी साहाय्यक समिती पुणे या संस्थेचे प्रमुख) प्रत्येक गोष्ट नीट करण्याचा हट्ट असायचा. १९६७, फ्रेंच लोकांचं पुण्यात

पृष्ठ ५४ वर

अरुण गोसावी

# निवडणूकपूर्व हालचाली
# मुंबई

मुंबईत सध्या आमदार निवास, काँग्रेस भवन, टिळक भवन 'वर्षा' 'रिव्हेरा' अशा ठिकाणी पांढरे कपडे घातलेल्या पुढाऱ्यांची प्रचंड गर्दी दिसते. धपापत्या छातीवर हात ठेवून आणि डोळ्यात प्राण आणून हे एकमेकाला विचारत असतात, 'मिळेल काहो ? तिकीट मिळेल ?'

काँग्रेस पुढाऱ्यांना व्याकूळ होण्याचे कारण यावेळच्या लोकसभेच्या जागांचे वाटप एवढे सोपे राहिलेले नाही. सध्या आहेत त्या खासदारांना तिकिटे देऊन टाका माणूस चांगला नसेल तर दुसरी माणसे आहेतच तयार. जिल्हा कमिटीची शिफारस आहेच. चला, सौदा करा, कोण चांगला खर्च करू शकतो. माणूस आपल्याच हाता-खाली राहणारा आहे ना ? ठीक आहे. तर मग देऊन टाका तिकीट त्याला.

ही आता एवढी साधी गोष्ट राहिली नाही. आता काँग्रेसचा प्रत्येक उमेदवार निवडताना तो कुणाचा माणूस आहे याची बारकाईने छाननी होते आहे. प्रदेश कमिटीने निवडलेल्या उमेदवारांची यादी मध्यवर्ती संसद मंडळाकडे पाठविली की ती औपचारिकपणे मंजूर होऊन येणार अशी परिस्थिती आता उरलेली नाही. दिल्लीला इंदिरा गांधी प्रत्येक यादी बारकाईने तपासणार आहेत. कोण कुणाचा माणूस आहे याची परीक्षा होणार आहे आणि जरूर पडल्यास खालून आलेल्या यादीतील नावे काढून टाकून बाई स्वतःला हवी असलेली नावे टाकणार आहेत.

मध्यावधी निवडणुका घेण्याच्या अनेक उद्देशांमध्ये हादेखील एक महत्त्वाचा हेतू आहे. आपले वैयक्तिक अनुयायी दिल्लीला आणणे. इंदिरा गांधींच्या या पवित्र्याने इतर काँग्रेस पुढाऱ्यांची मोठीच तारांबळ उडाली आहे. इतर पुढाऱ्यांची म्हणजे यशवंतराव चव्हाण आणि बाबू जगजीवनराम यांची. कारण लोकसभेत इंदिरा गांधींनी सारेच आपले अनुयायी आणल्यानंतर या दोघांच्या नेतृत्वाचे काय होणार ? त्यांची किंमत काय उरणार ? या साऱ्या राजकारणामुळे काँग्रेस पक्षात सध्या जोरात खळबळ माजली आहे.

सिंडिकेट कॉंग्रेसच्या गुप्तहेरांची तर अशी बातमी आहे की, महाराष्ट्रातील ४५ उमेदवारांपैकी कमीत कमी २५ लोक तरी 'आपले' असावेत असा इंदिराबाईंचा आग्रह आहे. त्यामुळे महाराष्ट्र कॉंग्रेस नेते हैराण झाले आहेत. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाला शह देण्याचाच हा प्रयत्न आहे असे मानले जाते. म्हणूनच सिंडिकेट कॉंग्रेसचे लोक आजकाल यशवंतरावांकडे जरा सहानुभूतीने बघतात.

महाराष्ट्र विधानसभा बरखास्त करण्याच्या बाबतीतदेखील हीच पंचाईत झाली. बरखास्त करून नवीन निवडणुका घेण्याचा उद्देश हा की या घाईगर्दीत आहेत त्याच आमदारांना तिकीटे देऊन आपला गट कायम टिकविणे. त्याप्रमाणे महाराष्ट्र विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय नेत्यांनी घेतला. त्याला श्री. चव्हाणांची संमतीही मिळाली होती असे म्हणतात. राज्याच्या मंत्रीमंडळानेही बहुमताने निर्णय पक्का केला. त्यानंतर मुख्यमंत्री नाईकांनी हा निर्णय लगोलग जाहीरही करून टाकला.

परंतु प्रधानमंत्री इंदिरा गांधींच्या ग्रँड स्ट्रॅटेजीमध्ये हे बसत नव्हते. बाईंच्या चालीनुसार त्यांनी राष्ट्रपती-निवडणुकीच्या निमित्ताने कॉंग्रेसमधील बडे सिंडिकेट खतम केले. पण तेवढ्याने काम भागले नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे आणखी एक सिंडिकेट शिल्लक आहेच. बाईंना हेही सिंडिकेट बाजूला सारून सर्वत्र आपली माणसे पेरायची आहेत. अर्थात कोणत्याही प्रधानमंत्र्याला योग्य रीतीने हुकमत गाजवायची असेल तर असे करणे आवश्यक असते. नेहरूंनी असेच केले होते.

वेळ कमी उरला होता. लोकसभेचे उमेदवार निवडायचे आहेत. त्यांचीच संख्या सव्वापाचशे. त्यात आणखी महाराष्ट्र विधानसभेचे २७० उमेदवार निवडायचे. आपला माणूस कोण दुसरा कोण याची छाननी करणे किती जिकीरीचे काम. त्यामुळे या गडबडीत महाराष्ट्र विधानसभेच्याही मध्यावधी निवडणुका आताच घेणे बाईंच्या दृष्टीने हिताचे नव्हते. ७२ साली सवडीने हे काम करता येईल.

म्हणून थोडासा वास लागताच इंदिराबाईंनी दिल्लीहून लगेच जाहीर करून टाकले की इंडिकेट सत्तेवर असणाऱ्या राज्यांमध्ये सध्याच मध्यावधी निवडणुका होणार नाहीत. दिल्लीहूनच आज्ञा आल्यावर महाराष्ट्र नेते तरी काय करणार? पुण्याहून चव्हाणांना सांगावे लागले की महाराष्ट्राच्या मध्यावधी निवडणुका घेण्याची आताच गरज नाही.

महाराष्ट्र नेते आताच मध्यावधी निवडणुका घेण्यास उत्सुक होते याची आणखीही कारणे आहेत. नाही म्हटले तरी महाराष्ट्रातही इंडिकेट सध्या घसरगुंडीवरच आहे. म्हणजे एवढ्या प्रचंड प्रमाणावर घसरगुंडी नाही. पण आहे. १९७२ सालापर्यंत कुणी सांगावे? त्यावेळी इंदिराबाईंच्या अनुयायांना तर तिकीटे द्यावी लागतीलच. पण बहुसंख्याही बरीच कमी होण्याची शक्यता आहे. त्यापेक्षा सध्याच्या आमदारांनाच तिकीटे देऊन लगोलग निवडणुका घेतल्या तर आहे ती बहुसंख्या

तरी काहींशी टिकविता येईल. असा विचार होता. पण सारेच ऑफस झाले.

महाराष्ट्रातही इंडिकेट काँग्रेसचा आत्मविश्वास घसरू लागला आहे. याची निश्चित चिन्हे दिसतात. हिंदी सिनेमातील हीरो ज्याप्रमाणे आपल्या प्रेयसीचा पाठलाग करतो तशी इंडिकेट काँग्रेस निवडणूक समझोता करण्यासाठी शेतकरी कामकरी पक्षाच्या पाठीमागे लागली होती. शे. का. प. चे नेते नको नको नको म्हणून सांगत होते तरी इंडिकेटचे निरोपावर निरोप शे. का. प. कडे जात होते. शेवटी 'अम्हास तुमच्याशी कर्तव्य नाही' असे स्पष्ट सांगितल्यावरच इंडिकेट नेते गप्प बसले. हे काय इंडिकेटच्या सामर्थ्याचे लक्षण आहे ?

तीच परिस्थिती शिवसेनेबाबतची. नाही म्हटले तरी इंडिकेटने या निवडणुकीत शिवसेनेशीही म्होतूर लावण्याची व्याकुळता दाखविली होती हे स्पष्ट झाले आहे. इंडिकेटचा आत्मविश्वास गेला आहे हेच खरे.

अर्थात याचा अर्थ महाराष्ट्रात इंडिकेटला जोरदार माघार घ्यावी लागणार असाही नाही.मण महाराष्ट्रातून लोकसभेवर जाणाऱ्या उमेदवारांची संख्या आहे तशी टिकविणे इंडिकेटला जड जाणार आहे. महाराष्ट्रातल्या पंचेचाळीस लोकसभेच्या सदस्यांपैकी अविभक्त काँग्रेसचे ३७ उमेदवार होते, दोन कम्युनिस्टांचे, दोन संयुक्त समाजवाद्यांचे, दोन शे. का. प. चे, एक प्रजासमाजवाद्यांचा आणि एक अपक्ष.

या ३७ काँग्रेस खासदारांपैकी रत्नागिरीच्या शारदाबाई मुकर्जी, मुंबईचे शांतिलाल शाह आणि ताराबाई सप्रे, भंडाऱ्याचे अशोक मेहता, वर्ध्याचे कमलनयन बजाज आणि बुलढाण्याचे राणे हे जुन्या काँग्रेसमध्ये गेले. त्यापैकी राणे वारल्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत इंडिकेटचे महाजन निवडून आले. त्यामुळे लोकसभेत महाराष्ट्राचे ३२ इंडिकेट आणि पाच सिंडिकेट खासदार होते.

या बत्तीस जागा टिकवून धरण्याची इंडिकेटची धडपड चालू आहे. मुंबईमध्ये इंडिकेटची फक्त भंडारेंचीच जागा उरली होती. भंडारे निवडून आले होते ते अगदी अल्पमतांवर आणि तेही अत्र्यांच्या विरुद्ध. शिवसेनेने पाठिंबा दिल्याने. शिवसेना, सिंडिकेट, सं. सो. पा., स्वतंत्र, जनसघ यांच्या पाठिंब्यावर जो ( शिवसेनेचा ) उमेदवार या मध्य-मुंबई मतदारसंघातून उभा राहणार आहे त्याचा पराभव करणे भंडारेंना जवळजवळ अशक्य होईल. त्यामुळे इंडिकेटची मुंबईतील एकमेव जागा जाणार आहे. मुंबईतल्या इतर जागा आपल्याला मिळतील असे खुद्द इंडिकेटवाल्यांना स्वप्नातही वाटत नाही. त्यांच्याजवळ उमेदवारच नाहीत. चांगल्या उमेदवारांच्या ते शोधात आहेत. पण मिळत नाहीत.

मुंबईशिवाय इतरत्र महाराष्ट्रात ज्या विरोधी पक्षीयांच्या जागा आहेत त्या परत मिळविणे तर इंडिकेटला कठिणच. पण आणखीही काही जागा गमविण्याची भीती निर्माण झाली आहे.

शे. का. प. ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यामुळे कोकणातली एखादी जागा ते इंडिकेटकडून हिरावून घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नाशिक जिल्ह्यात इंडिकेट कार्यकर्त्यातच प्रचंड लाथाळी माजली आहे. या गडबडीत तीही जागा जाण्याचा संभव आहे. शिवाय सांगली, अकोला व नागपूर भागात जनसंघ, सिंडिकेट-काँग्रेस आणि स्वतंत्र यांचा एकच असा मोठा जोर आहे. तेथे इंडिकेटला जोराची टक्कर देऊन डोके फोडून घेण्याची पाळी येणार आहे. संयुक्त समाजवाद्यानी मराठवाड्याच्या काही भागात आपली पॉकेट्स निर्माण केली आहेत. त्यांनाही नव्या बड्या आघाडीचा फायदा मिळेलच.

तेव्हा महाराष्ट्रातल्या इंडिकेट खासदारांची संख्या कमी होणार अशी फार मोठी शक्यता निर्माण झाली आहे. ती आता कितीने कमी होणार हाच प्रश्न आहे. महाराष्ट्रात फिरून आलेल्या सिंडिकेटच्या एका ज्येष्ठ नेत्याने कमीत कमी सहा जागा तरी इंडिकेट गमावेल असे खाजगी बोलण्यात सांगितले. महाराष्ट्राच्या बाबतीत हेही नसे थोडके.

इथे हे स्पष्ट केले पाहिजे की महाराष्ट्राच्या बाबतीत सिंडिकेट काँग्रेसला फारशा आशा नाहीत. बुलढाण्याच्या पोटनिवडणुकीत जसे इतर ठिकाणच्या सिंडिकेटच्या जागांमध्येही होण्याची शक्यता ते विसरत नाहीत. परंतु त्यांचा विश्वास वाढला आहे हे नक्की. सिंडिकेटचा आणि जनसंघाचा महाराष्ट्र इंडिकेटसाठी थोडा सॉफ्ट कॉर्नरही आहे. तो यशवंतरावांमुळे. ' आपले ' अनुयायी निवडून यशवंतरावांना मागे फेकण्याची इंदिराबाईंची जी धडपड चालू आहे त्याकडे ते सहानुभूतीने बघतात आणि या गडबडीत यशवंतराव रुष्ट होऊन कदाचित आपल्याकडे झुकतील अशीही आशा ते बाळगून असतात.

इंडिकेटच्या जागा कमी होण्याबद्दल ही जी भीती व्यक्त केली केली जाते ती सध्याच्या जागांच्या हिशेबावरून. पण कुणी सांगावे ? इंदिराबाईंचे वैयक्तिक आकर्षण जबरदस्त आहे. कार्यक्रमविहीन बड्या आघाडीऐवजी मतदार इंडिकेटलाच मत द्यायचे. मतदारांचे लहर काय सांगता येते ?

गेल्या लोकसभेत महाराष्ट्रातून गेलेले विरोधी पक्षीय खासदार आठ. ते म्हणजे डांगे (मुंबई), नाना पाटील (भीड)–दोघेही कम्युनिस्ट–, सं सो. पा. चे मुंबईतून फर्नांडिस आणि पुण्यातून एस्. एम्. जोशी, शे. का. प. चे कुलाब्यातून नानासाहेब कुंटे आणि हातकणंगलेहून कोल्हापूरच्या राणीसाहेब, प्र. स. प. चे राजापूरहून नाथ पै आणि चांद्याचे अपक्ष कौशिक.

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातून झालेल्या एकूण मतदानापैकी अवघी ४६ टक्के मते अविभक्त काँग्रेसला पडली होती. ही टक्केवारी टिकविण्याची इंडिकेटला खात्री नाही. एकूण साऱ्या पक्षातच संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र काँग्रेसला सवय यशवंतरावांचा शब्द मानण्याची. आज त्याच

शब्दाला किमत आहे की नाही अशी शंका निर्माण झाली आहे. महाराष्ट्र काँग्रेसच्या बाबतीतही क्रांतीच. म्हणूनच हा संभव. एका खासदाराला विचारलं, "काय झालं ना तिकीट पक्कं ?" तर त्याचं उत्तर आलं, "साहेबांनी तर पक्कं केलं आहे हो. पण दिल्लीत ओ. के. होतंय की नाही कुणास ठाऊक." महाराष्ट्र काँग्रेसमधील हा बदल महत्त्वाचा आहे. त्याचा निवडणुकीवर परिणाम होईलच.

शिवसेनेची तुतारी प्रथमच लोकसभेत वाजणार आहे हे नक्की. ईशान्य-मुंबई मतदार संघात जनसंघ की शिवसेवा हे भांडण पेटले असले तरी मध्य-मुंबई आणि दक्षिण-मध्य-मुंबई या पैकी दोन्ही किंवा एक तरी जागा शिवसेनेला मिळायला हरकत नाही. दक्षिण-मध्य-मुंबईतून आता डांगे उभे रहात नाहीत हे नक्की झाले आहे. नाहीतर मोठी जोराची लढाई झाली असती आणि शिवसेनेला ती जिंकणे कठीण गेले असते. ईशान्य-मुंबई मतदारसंघातल्या भांडणामुळे मात्र तिसऱ्याच कुणाची तरी पोळी पिकण्याची शक्यता आहे. जनसंघाचे म्हणणे आहे की या मतदारसंघातून मुकुंदराव आगासकरांनी बर्व्यांच्या आणि शिवसेनेच्या विरोधात ८९ हजार मते मिळविली होती. तर शिवसेनेचे म्हणणे ठाणे हा भाग आमच्या मतदारांचा आहे. दोघेही अडून बसले आहेत. दोघांचेही उमेदवार उभे राहिले तर मुंबईत इतर ठिकाणी मोठीच पंचाईत येईल. अपक्ष उमेदवाराला उभे करण्याचा तोडगा जनसंघाला अद्याप मान्य झालेला नाही. याउलट दक्षिण-मुंबई मतदारसंघातही अशीच परिस्थिती आहे. स. का. पाटलांनी पाय काढला. पण फर्नांडिस मात्र माघार घ्यायला तयार नाहीत. फर्नांडिसांनी माघार घेतली नाही तर शिवसेना आखाड्यात उतरणार. दरम्यान फर्नांडिसांना बाजूला सारून पालखीवाला यांना अपक्ष उमेदवार म्हणून उभे करण्याचे घाटत आहे.

येणेप्रमाणे शिवसेनेच्या प्रवेशामुळे मुंबईच्या बहुतेक मतदारसंघात जरा नाट्यमय वातावरण निर्माण झाले आहे.

"शिवसेना आणि निवडणुका" यावर परवा सुंदराबाई हॉलमध्ये बोलताना सरसेनापती बाळ ठाकरे यांनी फेकलेली वाक्ये अशी—

—मी तुम्हाला मतांची भीक मागायला आलो नाही. द्यायची असतील तर द्या. नाहीतर लालभाईंना देश बहाल करा.—

—मनात आणलं तर आम्ही मुंबईच्या पाचही जागा लढवून आमच्या ताकदीवर जिंकून दाखवू— केवळ सामान्य उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून आम्ही मुंबईतल्या दोन जागा सिंडिकेटसाठी मोकळ्या ठेवल्या. तो आमचा "सॅक्रीफाईस" आहे.

—सर्व राष्ट्रवादी पक्षांनी आपापली लेबले टाकून देऊन एकच "आझाद हिंद" पक्ष स्थापन करावा आणि कम्युनिस्टांचा पाडाव करावा—या वाक्याला सर्वात जास्त टाळ्या पडल्या.

¤ ¤ ¤

८ जानेवारी, १९७१

# माझा अ-निवडणुकीचा जाहीरनामा

प्रभाकर पाध्ये

'माणूस 'च्या संपादकांना माझा निवडणुकीचा जाहीरनामा हवा आहे. मी जे खरडणार आहे त्याला मात्र मी अ-निवडणुकीचा जाहीरनामा म्हणणार आहे, कारण तो वाचल्यावर मला कोणी निवडून देईल अशी समजूत करून घेणं म्हणजे दिल्लीला एखादा विशिष्ट पक्ष निवडून आला की सुखासमाधानाचा पतंग भारताच्या आकाशात फडफडू लागणार आहे अशी आशा करण्यासारखंच आहे.

अशी कल्पना करू या की आपण देशातली प्रचलित राजकीय हवा काही काळ अजिबात विसरू शकलो आहोत आणि आपल्याला काय हवं आहे याची यादी करीत आहोत. माझी यादी अशी असेल—

१. देशाची औद्योगिक प्रगती झपाट्यानं व्हायला हवी. त्यासाठी प्रथम भांडवल-संचय हवा.

२. देशातली बेकारी नष्ट व्हायला हवी — त्यासाठी शक्य तितक्या लोकांना रोजगार मिळायला हवा.

३. आणि या गोष्टी राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि लोकसत्ताक राज्यपद्धती यांच्या चौकटीत व्हायला हव्यात.

आधुनिकता, निर्भेळ राष्ट्रीयत्व, सांस्कृतिक विकास, अशा इतर ज्या अनेक गोष्टी आहेत त्या या मूलभूत गोष्टींवर अवलंबून आहेत हे थोड्याशा विचारानं आपल्या ध्यानात येईल. समता आणि सामाजिक न्याय या गोष्टींची प्रस्थापना करण्यासाठीसुद्धा या गोष्टींची साधना अगोदर करावी लागेल.

## येथे समाजवादाचा धोशा नको

या गोष्टींची साधना आपण कशी केली? आपण समाजवादाचा (म्हणजे राष्ट्रीयीकरणाचा) मंत्र जपला. आणि जेथे समाजवादाचा धोशा लावला नाही तेथे अनेक नियंत्रणांचे पाश आवळले.

पण करायला काय हवं होतं ? प्रथम भांडवलसंचयाची चिंता करायला हवी होती. हे कार्य सरकार करू शकत नव्हतं. ते कार्य करण्याची कामगिरी भांडवलदारांनीच चांगली बजावली असती. पण आपण समाजवादाचं व्रत घेतलं. म्हणून आपण असं धोरण आखल की राष्ट्राचे मूलभूत धंदे सार्वजनिक क्षेत्रातच उभारले पाहिजेत. याला अर्थात भांडवलं हवं होतं. त्यासाठी दोन गोष्टींचा अवलंब आपण केला. पाश्चात्य राष्ट्रांकडून कर्ज आणि सहाय्य घेतलं आणि जेथे म्हणून कर बसविता येतील तेथे (काही अपवाद करून) कर बसविण्यास सुरुवात केली.

अर्थात पुरेसा भांडवलसंचय झाला नाहीच. नोकरशाही बेसुमार माजली. तिला काटकसर आणि संयम यांची सवय नव्हतीच. ती तिची प्रवृत्तिही नसते. त्यामुळं उधळा कारभार माजला. आपले बडे केंद्रीय मंत्री महिना ३७००० आणि छोटे मंत्री महिना १६००० रुपये खर्च करतात, आणि त्यांच्या नोकरांचीही तशीच चाल असते. अर्थात भांडवलसंचयाऐवजी करवाढ चिक्कार झाली आणि राष्ट्रीय कर्ज वारेमाप फुगलं.

भांडवलसंचयाप्रमाणं भांडवलाच्या विनिमयाची अक्कलही नोकरशाहीपेक्षा भांडवलवाल्यांना अधिक असते. पण आपण समाजवादाचा वसा घेतला होता, आणि म्हणून आपण राष्ट्रीयीकरणाच्या नावानं नोकरशाही माजवली आणि नियंत्रणांचं अफाट जाळं पसरलं.

मला असं म्हणायचं आहे की, भांडवलसंचयाचं आणि औद्योगिक धंद्यांची वाढ करण्याचं कार्य भांडवलवाल्यांनीच चांगलं केलं असतं. आपण ते त्यांनाच करू द्यायला हवं होतं. अर्थात त्यांना ताळ्यावर राखणं भाग होतं. कामगारांची हवी-तशी पिळवणूक आणि भांडवलाचा वारेमाप (अनावश्यक) उपयोग त्यांना करू द्यायला नकोच होता. त्यासाठी काही नियंत्रणं, काही कायदे करायलाच लागले असते. असे कायदे सर्व भांडवलशाही राष्ट्रात असतात. पण आपण समाजवादाच्या नशेत या दृष्टीनं कधी विचारच केला नाही.

गेल्या वीस-पंचवीस वर्षांचा विचार केला तर साऱ्या जगात साधारणपणं भांडवलशाही राष्ट्रांची आर्थिक प्रगती चांगली झाली आहे. (तैवान, जपान, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया कानडा, अमेरिका) आणि समाजवादी राष्ट्रांची अर्थव्यवस्था कुचंबली आहे (रशिया, चीन, पूर्वयुरोपातील राष्ट्र) असं दिसून येईल. पण समाजवादाच्या धांदलीत हे आपल्याला कधी दिसलंच नाही, अद्यापही दिसत नाही.

धंदे उभारणीचं कार्य आपण भांडवलवाल्यांकडे दिलं असतं तर देशाची औद्योगिक प्रगती अधिक झपाट्यानं झाली असती, अधिक व्यवस्थित झाली असती, आजचे अवघडलेले अवजड राष्ट्रीय कारखाने अकारण उभे राहिले नसते आणि त्यांनी तोटा आणि गैरव्यवस्था यांचे उकिरडे माजविले नसते.

## अशी मिश्र व्यवस्था हवी

अर्थात काही ठिकाणी भांडवलवाल्यांना शिस्त लावण्यासाठी, त्यांच्यावर निरामय नियंत्रण घालण्यासाठी त्यांच्याशी स्पर्धा करणारे कारखाने राष्ट्राला उभारावे लागलेच असते. पण त्यांची दृष्टी निराळी राहिली असती. यामुळं निर्माण होणारी मिश्र अर्थव्यवस्था अधिक निरोगी ठरली असती. आजची मिश्र अर्थव्यवस्था काही उद्योगधंदे फक्त सार्वजनिक क्षेत्रात उभारण्याची आहे. दरेक क्षेत्रात खाजगी भांडवलवाले आणि सरकार यांची स्पर्धा करणारी मिश्र अर्थव्यवस्था अधिक फायद्याची आणि औद्योगीकरणाला व्यवस्थित वळण लावणारी ठरली असती. पण ही अर्थव्यवस्था आपल्या समाजवादी हिशेबात बसत नव्हती.

उद्योगधंद्यांची व्यवस्थित वाढ झाली असती तर आज शहरात जी बेकारी माजलेली दिसते ती तितकी माजली नसती, आणि जी ऐतखाऊ मिजासखोर नोकरशाही बोकाळली आहे तीही तितकी बोकाळली नसती. आणि परकीय राष्ट्रांकडून मिळणारी मदत, पुष्कळ प्रमाणात, आपल्याला सांस्कृतिक प्रगती आणि समाजकल्याण यासाठी वापरता आली असती.

पण समाजवादाची वारुणी आपण प्रमाणाबाहेर झोकलेली असल्यामुळे देशाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा हा नैसर्गिक मार्ग आपल्याला दिसलाच नाही, आणि ठिकठिकाणी समाजवादानं नशाटलेले मंत्री आणि नोकरशहा मात्र आपण निर्माण केले !

## समाजवाद येथे हवा

मी शेतीबद्दल अद्याप काही बोललोच नाही. देशात हरितक्रांती होऊन चुकली आहे अशा भ्रमात आपण आहोत असं दिसतं. पण ही हरितक्रांती चांगल्या पाऊसपाण्याच्या कालात झालेली आहे. अवर्षणात ती किती टिकते ते अद्याप आपल्याला पाह्यचं आहे.

एक गोष्ट आपण चांगली केली. नेहरूंच्या नेतृत्वाखाली आपण कुळकायद्यासारखे कायदे केले. पण जमीनदारोला मूठमाती देऊ पाहणारे हे कायदे अनेक राज्यात अमलात आलेच नाहीत, आणि जो काही हरितक्रांती झाली आहे ती कुळकायद्यांसारख्या कायद्यानी झालेली नाही तर तांत्रिक उपाययोजनेमुळं झाली आहे असं प्रो. दांतवाला यांनी अगदी अलीकडेच, अर्थशास्त्रज्ञांच्या वार्षिक परिषदेत सांगितलं आहे.

पण या हरितक्रांतीनं मनोमन खूष होऊन जाण्यासारखी परिस्थिती आहे काय ? खेड्यात सुस्थिती आली आहे, पण तिचा फायदा कोणाला मिळाला आहे ? काही मूठभर श्रीमंत शेतकऱ्यांना ! खेड्यातले रोजगार आणि राजकीय अधिकार या

श्रीमंत शेतकऱ्यांच्या हातात एकवटले आहेत. बहुसंख्य शेतकरी दारिद्र्य आणि बेकारी यांनी गांजलेले आहेत.

आपल्या समाजवादाची दृष्टी सरळ असती तर ती अगोदर खेड्याकडे वळली असती. आपली खरी बेकारी खेड्यात आहे. खेड्यात काम मिळत नाही म्हणून बेकार शहरात गर्दी करीत आहेत, आणि झोपडपट्टी माजवीत आहेत.

आपल्या समाजवादानं खेड्याकडे कूच करायला हवी होती. तेथे समाजवादाची खरी आवश्यकता आहे. आपण ठिकठिकाणी राष्ट्रीय शेतमळे आणि त्यांना आनुषंगिक असे उद्योगधंदे काढायला हवे होते. समाजवादाला खरी हाक खेड्यातून आहे. पण ती शुद्ध स्वरूपात आपल्याला ऐकायलाच येत नाही. आपण सहकारी कारखाने सुरू केले आणि ते श्रीमंत शेतकऱ्यांच्या नफेबाजीचे अड्डे बनले. खेड्यात एक नवीनच भांडवलशाही आपण माजवली. पण गरीब शेतकरी होता तेथेच राहिला.

खाजगी शेती बंद करा असं मला मुळीच म्हणायचं नाही. सारी शेती सार्वजनिक क्षेत्रात ओढा असा अचरटपणा मला करायचा नाही. मला खाजगी शेतीच्या जोडीला सार्वजनिक शेती आणि तिला आनुषंगिक असे सार्वजनिक उद्योगधंदे हवे आहेत.

यांना पैसा आणायचा कोठून? याचं उत्तर सोपं आहे. आपल्या सरकारनं आपली हावरी करबसवी दृष्टी खेड्यात वळवावी–शेतीच्या उत्पन्नावर कर बसवावेत.

पण ही भाषा देखील आपल्या सरकारलाच काय, पण उजव्या आघाडीला सुद्धा सहन होणार नाही. ते सारे श्रीमंत शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहेत.

पण आमचे समाजवादी पक्ष ही नवी दृष्टी घेऊन उभे राहतील अशी माझी आशा होती–पण तेही प्रचलित 'डावखोरेपणा'नं भारले आहेत. आजच्या समाजवादाच्या म्हणजे राष्ट्रीयीकरणाच्या हवेत माझे हे विचार कोणाला पटणारच नाहीत–

अशा परिस्थितीत माझा हा कार्यक्रम घेऊन मी निवडणुकीला उभा राहू शकत नाही. म्हणून मी त्याला "अ-निवडणुकीचा जाहीरनामा" म्हणतो.

पण सर्वसाधारण मतदाराला मी एवढंच सांगेन की देशात स्थिर सरकार निर्माण करण्यासाठी तुमचं मत वापरा.

□ □ □

# आंतर-महाविद्यालयीन कथाकथन स्पर्धा

दादरच्या मराठी साहित्यसभेने आयोजित केलेल्या आंतर–महाविद्यालयीन कथा-कथन स्पर्धेचं पर्व नुकतंच मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयात पार पडलं. गेली काही वर्षं मराठी साहित्यसभा, ह्या स्पर्धा 'शब्दरंजन-स्पर्धे'च्या सहाय्याने आयोजित करीत असते. सभेतर्फे प्रथम क्रमांकाच्या विजेत्या महाविद्यालयाला एका वर्षापुरती 'शब्दरंजन' पुरस्कृत ट्रॉफी देण्यात येते. विजयी उमेदवारांना दीडशे, शंभर, पन्नास अशा रकमांची रोख पारितोषिकेही वाटण्यात येतात. यंदा ही रुपेरी ट्रॉफी मुंबईच्या रूईया महाविद्यालयाकडे गेली आहे. रोख पारितोषिकात पहिले दीडशे रुपयांचे बक्षीस मुंबईच्या सिडनहॅम वाणिज्य महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अलका म्हात्रे हिने पटकावले. तिने द. मा. मिरासदारांची "शिवाजीचे हस्ताक्षर" ही विनोदी गोष्ट साभिनय सांगितली. स्पर्धेतले शंभर रुपयांचे दुसरे पारितोषिक अहमदनगरच्या सारडा महाविद्यालयाचा विद्यार्थी हेमंत काळे ह्याने प्रा. उत्तम शिरवळकरांची "हिसका" ही इरसाल अनुभव गावरान भाषेत विनोदी ढंगात मांडणारी गोष्ट सांगून पटकावले. हेमंत काळे ह्यांचे शब्दोच्चार शुद्ध, स्पष्ट तर होतेच, पण शिवाय त्यांनी गोष्टीतला विनोदाचा बाज नीट समजून घेऊन श्रोत्यांपर्यंत पोहोचवला. रुईयाच्या कु. मंगला राव हिला पंच्याहत्तर रुपयांचे तिसरे पारितोषिक मिळाले. तिने श्री. व. पु. काळे ह्यांची 'ह्या ज्वाळा, ह्या ज्वाळा !' ही करुणाजनक कथा तन्मयतेने सांगितली. एलफिन्स्टन महाविद्यालयाच्या कु. जोशी हीने विद्याधर पुंडलीकांची 'वॉर्ड नं. ७' ही शोकात्म कथा चांगली सांगितली म्हणून तिला परीक्षकांनी खास शिफारस केलेले रु. पंचवीसचे प्रोत्साहन पारितोषिक मिळाले.

गेली पाच सहा वर्षं कथाकथन हा करमणूकीचा प्रकार हळूहळू मूळ धरू लागला आहे. माडगूळकर बंधु, द. मा. मिरासदार, वसंत सबनीस, व. पु. काळे वगैरे लेखकांनी त्यात फार वरच्या दर्जाचे प्राविण्यही मिळविले आहे. हा प्रकार अधिक वाढला पाहिजे, कारण त्यामुळे सामान्य वाचकांची रुची वाढण्याला हातभार तर लागेलच; शिवाय, रंजनप्रधान गुणांनी मंडीत झालेले साहित्य रसिकांच्या फार मोठ्या संख्येपर्यंत झिरपत जाईल. काव्यवाचनाची घाटणी ढंगदार झाल्यापासून कवितेला सामान्य रसिकांचा आश्रय अधिकाधिक मिळू लागला आहे, हा अगदी अलीकडला इतिहास आहे. तोच न्याय, कथावाचन कौशल्यपूर्ण होऊ लागले, तर मराठी कथेलाही लागू होईल. जमावासमोर कथा वाचून दाखवण्यात

काहीही कमीपणा नाही. चार्लस् डिकन्सने आपले लिखाण तिकीटे लावून वाचून दाखवून उभ्या अमेरिका खंडावर जादू केली होती, आणि आजमितीसही एमिलीन विल्यम्स् वगैरे धुरंधर मंडळी कथाकथनाचे साभिनय प्रयोग करून लोकप्रियतेचे उच्चांक मोडत आहेत. तेव्हा, लोकप्रियता संपादन करण्याची ही दिशा तशी मोकळीच आहे.

मराठी साहित्यसभेच्या ह्या स्तुत्य आणि आवश्यक वाङ्मयीन उपक्रमाला महाविद्यालयांकडून मात्र जेमतेमच प्रतिसाद मिळाला. अरविंद सोहोनी, आशा भाजेकर वगैरे सभेच्या मंडळींनी मोठ्या जिद्दीने हे वाङ्मयीन सत्रापसत्र चालवले आहे. त्याची दखल घेण्याची आणि पर्यायाने आपल्याच विद्यार्थ्यांची स्पृहा वाढवण्याची सुबुद्धी शेकडा दहादेखील महाविद्यालयाच्या सूत्रधारांना होऊ नये, हे दुर्दैवच म्हणायचे. विदर्भ–मराठवाड्यातल्या वाङ्मयसेवकांवर मुंबईवाल्यांकडून सतत अन्याय होतो त्यांची घोर उपेक्षा होते असे दुखणाईत तुणतुणे सतत वाजवले जाते. त्याच विदर्भ-मराठवाड्यातल्या महाविद्यालयांनी ह्या चांगल्या शक्तिमान वाङ्मयीन स्पर्धांवर पूर्ण बहिष्कारच टाकल्यासारखे वाटत होते !

ह्या स्पर्धेमुळे काही ठळक गोष्टी ध्यानात आल्या :–

१. व. पु. काळे हे विद्यार्थी वर्गात सर्वाधिक लोकप्रिय कथालेखक आहेत.

२. विद्यार्थी विनोदी वाङ्मयावर खूष असतात. पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, द. मा. मिरासदार हे त्यांचे आवडते लेखक.

३. ज्यांत स्त्रीदुःखे भडभडून सांगितलेली असतात, ते कथासाहित्य विद्यार्थिनींमध्ये प्रिय असते. पं महादेवशास्त्री जोशी, व. पु. काळे वगैरेंचे तत्सम साहित्य त्या चवीने वाचतात.

४. जी. ए. कुलकर्णी, श्री. दा. पानवलकर, कमल देसाई, वगैरे नावे त्यांना ऐकूनसुद्धा माहित नाहीत. वसुधा पाटील, विद्याधर पुंडलीक वगैरे थोडेफार माहीत आहेत.

५. रणजित देसाई, दुर्गा भागवत, इंदिरा संत, शिरीष पै, पु. शि. रेगे वगैरेंनी सुंदर कथाही लिहिल्या आहेत ह्याचा कुणालाच पत्ता नव्हता. नवीनांना तर ते हिशोबातच धरत नाहीत. ◻

## कुदल : एक अतिनव लघुवार्तापट

तैय्यब मेहेता ह्या आंग्लविद्याविभूषीत अतिनवचित्रकाराने फिल्म्स् डिव्हिजनसाठी 'कुदल' हा वाचाभाष्य रहीत अतिनव धाटणीचा संगीत वार्तापट नुकताच तयार केला आहे. मेहेतांचे चित्रकलेतले शिक्षण मुंबईतल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्मध्ये आणि लंडनला झाले. नंतर रॉकेफेलर शिष्यवृत्ती घेऊन ते अमेरिकेत

गेले. परदेशात त्यांनी आपल्या चित्रांची प्रदर्शने मांडली होती. पासष्ट साली भर लेल्या भारतीय चित्रकलेच्या प्रदर्शनात त्यांना पारितोषिक देण्यात आले होते. कलानिर्मितीतील त्यांची स्वतंत्र शैली पाहून आता फिल्म्स डिव्हिजनने त्यांना एका वार्तापटाचे लेखन आणि दिग्दर्शन करायला सांगितले. कॅमेरामन एम. एस. पेंडूरकर भारतीय आकाशवाणीचे भूतपूर्व सरसंचालक डॉ. नारायण मेनन ह्यांचे संगीत आणि तैय्यब मेहेतांची अगदी अभिनव दृष्टी, ह्यांचा संगम म्हणजे सोळा मिनिटांचा हा अतिनव वार्तापट 'कुदल'

'कुदल' हा तामिळी शब्द आहे. ह्याचा अर्थ मिलन किंवा मिलाप. ह्या चित्रपटाचा विषय संघर्ष आणि प्रतिकार (Friction and Resistance). ह्या चित्रपटाला कथा नाही. वेगवेगळ्या दृश्यांची एक आशयसदृश घाटदार साखळी तुम्हाला पडद्यावर दाखविण्यात येते. जागा मिळेल तिथे अंग आखडून उघड्यावर निजलेले फेरीवाले, कामगार, बेकार, बकाबका भाताचे गोळे मटकावणारे भूकेकंगाल भिकारी; वाहनांना चुकवीत रस्ता ओलांडणारा कारकूनांचा घोळका; गाईबैलांचे मिथून निरखीत बसलेले खेडूत; कसाईखान्यातले रक्ताचे पाट, प्रचंड दालने आणि सोललेले धड उलटे अडकवून ठेवायचे हूक; खिडकीतल्या प्रसाधनमग्न वेश्या; महात्माजींचे महाप्रस्थान; दाक्षिणात्य मंदिराच्या लांबच लांब ओवऱ्या; देवासमोर पहारा करणारे दगडी नंदी. ही वेगवेगळी दृश्ये एकामागोमाग भरभर धावू लागतात. कसलेही भाष्य केले जात नाही. फक्त कर्नाटकी ढंगाचे संगीत तेवढे चालू असते. हे संगीतही पारंपारिक नाही. खाटीकखान्याची भयाण दृश्यमालिका चालू असताना खाटीकाच्या सुऱ्याची आठवण करून देणारा खड्खड् असा ध्वनीच तेवढा कानावर आघात करीत असतो. हा आवाज तालवाद्याचा आहे. असे अनेक सूचक पार्श्वध्वनी डॉ. नारायण मेनन ह्यांनी दिलेले आहेत.

ह्या दृष्यमालीकेचा हेतू अहिंसेचे महत्त्व पटविणे हा आहे असे दिग्दर्शक म्हणतो. हा वार्तापट पहात असताना त्याचा प्रत्यय येत नाही. प्रत्यय येतो, तो केवळ कलापूर्ण छायाचित्रे आणि संयमीत संगीत ह्यांच्या बळावर, अभिजात कलावंत पंधरा मिनिटं तुमची कशी धुंद नजरबंदी करू शकतो, ह्याचा. शंभर पानं घडाघडा बोलून जो परिणाम साधणार नाही, तो परिणाम तैय्यब मेहेतांनी निःशब्द चित्रीकरणाने साधला आहे. खाटीकखान्याच्या रिकाम्या गाळ्यांची पेंडूरकरांनी टिपलेली दृश्ये विलक्षण बोलकी झालेली आहेत.



# गुजरातचे रागरंग

**दादूमिया**

इंदिरा गांधींची निवडणुकीची जाहिरात मोरारजीभाईंना पुरते खलास करण्यासाठी झाली हे सत्य आता जगजाहीर आहे.

कारण काँग्रेस पक्ष दुभंगला तो मोरारजीभाईंच्या महत्त्वाकांक्षेमुळे. मोरारजी गुजराथचे, साहजिकच गेल्या वर्षी गुजरातच्या राजधानीत सिंडिकेट काँग्रेसचे अधिवेशन मोठ्या थाटात भरवून मोरारजीभाईंनी आपला जोर दाखवून दिला. कोणी काहीही टीका केली तरी त्या अधिवेशनात् काँग्रेस (संस्था) अगदीच लेचीपेची नाही हे सिद्ध झाले.

त्या गोष्टीस वर्ष होऊन गेले.

सिंडिकेट काँग्रेसचा बालेकिल्ला जर खूप मजबूत असला तर सिंडिकेट काँग्रेस मजबूत राहू शकणार ! तो किल्लाच पडला वा पडायच्या तयारीत असला तर काँग्रेस (ओ) संस्थेची " भाई, राम बोलो राम " म्हणायचीच पाळी येणार ! !

म्हणून तर साऱ्या लोकांचे गुजरातवर लक्ष लागून राहिले आहे.

कारण, गुजरात पडला—

बस्स, पुढचे बोलूच नका.

लोक आजकाल फार जागृत झाले आहेत. आपल्याला वाटते, आपल्याला राजकारणात काही थोडाफार कळते. आपण चार निरनिराळ्या पक्षांची वृत्तपत्रे वाचतो, चार पुढाऱ्यांना गाठून भेटतो, बऱ्याच ' इन्साईड् स्टोरीज् ' मिळवितो—

पण हा माझा सारा अहंकार आजकाल मावळत चालला आहे.

अगदी सर्वसामान्य माणूस एवढा जागृत होत चालला आहे की मला त्याचे मोठे कौतुक वाटते.

परवा एकजण माझ्याशी वाद घालीत होता, " काय हो, इतके दिवस हे बुजुर्ग इंदिरा गांधीस शिव्या घालीत होते, तिला राजीनामा दे म्हणून चिडवीत होते, तिचे मायनॉरीटी गव्हर्नमेंट आहे, तिला प्रधानमंत्री व्हायचा अधिकार नाही अशी बकबक करीत होते आणि आता तिने स्वखुषीने राजीनामा देताच यांना का बरे कंप सुटावा ?"

काय सुंदर आहे आर्ग्युमेंट ! ही चर्चा करणारा साधा कारकून आहे, बरं ! इंदिरेने त्यास काहीही भेट म्हणून दिलेली नाही का त्याचा पगार वाढविलेला नाही. मग या कारकूनास इंदिरेचा एवढा पुळका का यावा ?

दुसऱ्या एका मास्तरने मला पृच्छा केली, ' या साल्या विरोधी पक्षांचा फक्त एका मुद्याचा कार्यक्रम दिसत आहे. तो कार्यक्रम म्हणजे ' हटाव इंदिरा. ' अरे का हा अट्टाहास ? कशासाठी ? तुम्ही काही चांगला कार्यक्रम द्या जनतेस. मग जनता तुम्हाला आपोआप निवडून देईल !'

दुसऱ्या एका पानवाल्याचे ॲनॅलिसीस् ऐका: ' जनसंघाची माता आर. एस. एस. आणि आर. एस. एस. म्हणजे ' हिंदूराष्ट्र ' आज जनसंघ ' भारतीय ',' भारतीय ' म्हणून आम्हास फसवू पहात आहे. पण त्याने आम्ही फसणार नाही. तसेच स्वतंत्र म्हणजे चोर, बदमाष थैलीशहा. गरीबांना लुटून ज्यांना गब्बर व्हावेसे वाटते ते. तिसरे राजे महाराजे. ह्यांच्या लीला तर सर्वांना माहीत आहेतच. हे तिघे आता आपल्या फायद्यासाठी एकत्र आले आहेत, निव्वळ आपल्या फायद्यासाठी, साहेब. '

' पण त्यात बिघडले कोठे ?'

' ह्या तिघांनी लोकशाही वाचवा, लोकशाही वाचवा म्हणून कितीही कंठशोष केला तरी कोण फसणार यांच्या फसव्या घोषणांनी ? यांच्या राज्यात केवळ हुकूमशाही होती. हे गादीवर पुन्हा आले तर ते का लोकशाहीचा पुनर्जन्म घडवून आणणार आहेत ?'

चौथा आहे मिलमजूर. अबदुल गनी अबदुल हनीफ हे त्याचे नाव. त्याने मला स्पष्टपणे सांगितले, ' साहेब, आम्ही या भारतात राहतो आहोत. आम्ही इथेच रहाणार आहोत. इथेच मरणार आहोत. आम्ही काही पाकिस्तानास जाणार नाही.'

' बरं मग ?'

' याचाच अर्थ आम्ही सेक्युलर पक्षाला मते देणार. '

' उघड आहे. '

' मला सांगा, जनसंघ हा का सेक्युलर पक्ष आहे ? संघ आमच्या महंमदला शाखेवर येऊन देईल काय ? त्याचप्रमाणे स्वतंत्र पक्षाच्या भांडवलदारांना ' धर्म '

नावाची चीज माहीत आहे का? साल्यांचा धर्म एकच. पैसा. मग भले देश गेला खड्डयात, आणि ही संस्था काँग्रेस कुठली सेक्युलर? याच लोकांनी दोन वर्षापूर्वी मुस्लिम लीगशी लग्न लावून घेतले होते ना आपले? यांना आम्ही का म्हणून मते द्यायची? आम्हाला जगून तरी देतील का तिघे मिळून भारतात?'

वा: रे पठ्ठ्या, अबदुल्ल्या--

तुझ्या डोक्यात एवढी अक्कल असेल असे मला जन्मात कधी वाटले नव्हते.

या निवडणुकीच्या निमित्ताने मला सामान्य माणसाची ट्यूब लाईट अचानक लख्ख पेटल्याचे चित्र दिसून येत आहे.

त्याचप्रमाणे, जनतेची गाऱ्हाणी, जनतेतील असंतोष, जनतेच्या हृदयातील जळजळ आता कशी उफाळून वर येताना आज दिसते आहे. कदाचित् निवडणुका संपल्यावर पुन्हा सारे कसे शांत शांत होऊनही जाईल. पण ह्या अवस्थेत कोंडी फोडण्यास इंदिरा कारणीभूत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष होत आहे हे विसरता येत नाही.

प्रत्येकाच्या तोंडी आजकाल आहे इंदिरा-इंदिरा.

आमच्या शहराचीच गोष्ट. एका मोठ्या औषधींच्या कारखान्याच्या मालकाला येथील काँग्रेस (ओ) पक्षाच्या अध्यक्षाने गाठले. कारण उघड होते. वर्षास सहा कोटीचा फायदा काढणाऱ्या मालकाला या अध्यक्षसाहेबांनी नाही गाठायचे तर काय आम्हाला तुम्हाला गाठून त्यांनी विनंती करायची की काय, आमच्या पक्षास मदत करा म्हणून? चक्क नकार दिला ह्या मिल मालकाने! त्यांचे शब्द अद्धृत करु? "कोणच्याही परिस्थितीत मी इंदिरा गांधीचे शत्रुत्व ओढवून घेऊ इच्छित नाही."

वा: रे, इंदिरा प्रियदर्शिनीचा दरारा!

अर्थात् या अदृश्य धाकाचे उदाहरण मी माझ्या डोळ्यांनी अनुभवले आहे.

एक प्लास्टीकचा कारखाना सुरु झाला. आणि दोन महिन्यात बंद झाला.

खूप मोठी जागा आहे त्या मालकाजवळ. वीज आहे. पाणी आहे. रेल्वेची लाईन कारखान्यात आलेली आहे. साऱ्या भारतात फार मोठे नाव आहे या मालकाचे. मुंबईस कोटी कोटी रुपयांची गुंतवणूक त्याची आहे. हा प्लास्टीकचा कारखाना व्यवस्थित चालला असता तर पाचशे लोकांना नोकऱ्या सहज मिळाल्या असत्या. त्यामुळे इतर हजार माणसांचे भले झाले असते.

पण नाही चालला तो कारखाना.

दोनच महिन्यात बंद पडला.

कारण?

प्रियदर्शनी इंदिरा!

जास्त सांगण्यासारख नाही, पण या प्रियदर्शनीचा दरारा भयंकर आहे.

पृष्ठ २१ वर

# नेताजी, तुम्हीच काही सांगा बुवा !

मुंबईला लोकलच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातनं ऑफीसच्या वेळेला प्रवास करण्याचा अनुभव मोठा और असतो. तिसऱ्या वर्गातनं प्रवास करताना, गर्दी, निरनिराळे आवाज ह्यांनी जीव नकोसा होऊन जातो. पहिल्या वर्गातनंही गर्दी असतेच. पण आवाज ऐकू येतात ते फक्त होणाऱ्या श्वासोच्छ्वासांचेच ! प्रत्येक जण आपला पेपरात, नाहीतर पुस्तकात डोके खुपसून बसलेला. बाजूला बघणंही मग ते अशिष्ट समजतात. त्यातनं कुणी आपसात बोलतच असले तर अक्षरशः कुजबुजीच्या स्वरूपात थोडा कुठे कुणाचा मोठा आवाज आला, तर सगळ्या नजरा तिकडे वळतात. कपाळावर आठ्यांचं जाळं उभं राहतं. तुम्ही नवखे असलात, आणि शेजाऱ्याला काही प्रश्न विचारालात तर, पेपरातनं डोकं वर न निघताच मोजकं ' Yes ' किंवा ' No ' एवढंच उत्तर मिळतं. तेही, तुम्हाला जेमतेम ऐकू येईल एवढ्या हळू आवाजातलं. त्यानंतर डोकं इतकं पटक्कन पेपरात जातं, की पुढचा प्रश्नच विचारणं तुम्हाला जड जावं ! अशा आठ्यांना, शिष्टाचारांना न जुमानता चर्चा करणारे महाभाग, गप्पांचा फड मांडणारी टोळकीही असतात, पण अपवादात्मक...

परवा एकदा चेंबूर ते बोरीबंदर प्रवास पहिल्या वर्गानं करण्याची पाळी माझ्यावर आली. निम्मा प्रवास अक्षरशः मुक्यासारखा झाला. हातातला पेपर चाळून कंटाळा आला होता. बाजूला कुणी अवाक्षरही तोंडातनं काढत नव्हतं. तीन जागांच्या बांकावर साडेचौघं दाटीवाटीनं बसलो होतो, तरीदेखील शेजारी कुणी बसलं आहे ह्याविषयी शंका वाटावी अशी परिस्थिती होती. ह्याचवेळी चौघा तरुणांनी आपापसात तावातावानं चर्चा करत डब्यात प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाबरोबर डब्याचं स्वरूप एकदम बदललं. डबा ' जिणं ' जगू लागला, असंच निदान मला तरी वाटलं. त्या तरुणांनी आठ्यांकडे साफच दुर्लक्ष केलं. त्यांची चर्चा रंगत होती. आवाज चढत होता. सध्या वास्तविक दिवस निवडणुकांचे. सर्वत्र त्याच विषयावरची चर्चा आढळते. पण इथे मात्र विषय वेगळा होता. नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या मृत्यूचा वादग्रस्त विषय चर्चिला जात होता. निवडणुकीच्या धमालीत हा वेगळा विषय कानावर पडल्यामुळे तेवढंच बरं वाटलं. निरनिराळे मुद्दे पुढे मांडले जात होते.

" नेताजी जिवंत असते तर स्वातंत्र्यानंतर एवढे दिवस अज्ञातवासात राहण्याचं कारणच काय ? "

"नेताजी जिवंत असलेच पाहिजेत. त्यांच्या मृत्यूचा निश्चित पुरावा कुठेच हाती आलेला नाही. त्यांचे कित्येक सहकारी त्यांना अनेक वेळा भेटून आल्याचा दावा करतात ते काय उगीच ?"

"मलाही तसंच वाटतं. अरे, आताच त्या अमरावतीच्या प्राध्यापकांचं मत प्रसिद्ध झालं आहे. खोसला कमिशनपुढे साक्ष देताना जैन ह्यांनी तर सांगितलं की ते अलीकडे पाच-सहा वेळा सुभाषबाबूंसमवेत राहून आले आहेत. ते इतक्यात प्रगट होत नाहीत कारण त्यांना माहीत आहे, इथलं सरकार त्यांच्याविरुद्ध आहे. सगळ्याच राष्ट्रवाद्यांविरुद्ध हे सरकार आहे. श्यामाबाबू, दीनदयालजी, शास्त्रीजी कितातरी उदाहरणं आहेत...."

चर्चा हमरीतुमरीचं स्वरूप घेऊ लागली होती. आवाज वाढू लागले होते. तेवढ्यात एक "बघ्या" अनाहूतपणे म्हणाला, "असं बघा मित्रांनो ! भांडण्याची आवश्यकता नाही. मला प्लँचेट येतं न शिवाय घरी एक गोलकपण आहे. गोलकात जीवित पण अज्ञातवासात असलेल्या व्यक्तीला हवं असल्यास आपण पाहू शकतो. तेव्हा रात्री बारा वाजता आपण जमू. नेताजी मृत असतील तर प्लँचेटवर येतील, जीवित असतील, तर गोलकात येतील. पण आता कसेही आपण त्यांनाच सांगायला लावू त्यांच्या जीवन-मृत्यूचं गूढ !"

'अनाहूत' बिचारा गंभीरपणे बोलत होता. पण बाकोचे मात्र हसत होते. अगदी हमरीतूमरीवर आलेले ते चौघंही. का कोण जाणे ?

---

## 'मटका रामपूर'

सोलापूर जिल्ह्यातल्या 'कुर्डुवाडी' ह्या पंढरपूरी नेणाऱ्या जंक्शन गावाचं नाव बदलावं अशी सूचना पुढे आली आहे. त्याप्रित्यर्थ अनेक उत्साही लोकांनी अनेक नावं सुचवली आहेत. त्यातल्या एका नावानी माझं लक्ष चांगलंच वेधून घेतलं. सुचवलेलं नवीन नाव आहे "मटका रामपूर !"

ह्याचं कारणही तसंच मजेशीर आहे. गेल्याच आठवड्यात ह्या गावातल्या 'मटका' खेळणाऱ्यांना, मटक्यानं प्रसन्न होऊन लाखो रुपये बहाल केले. 'मटक्या'च्या ह्या उपकाराचं स्मरण म्हणून मटका भक्तांनी 'कुर्डुवाडी'ला 'मटका रामपूर' म्हटलं जावं असं सुचवलं आहे.

ह्याच धर्तीवर अनेक राज्यात अनेक नगरं आता नवीन नावं धारण करू शकतील.

राजस्थानातलं एखादं गाव "डेली लॉटरी सिटी" बनू शकेल. महाराष्ट्रात "लॉटरी नगर" आणि "पाक्षिक मटकावाडी" सहज अस्तित्वात येऊ शकतील !

---

# यह आकाशवाणी है!

"यह आकाशवाणीका पंचरंगी प्रोग्राम है विविध-भारती. अब प्रस्तुत करते हैं राजकीय पक्षोंका चुनाव बाबतका घोषणा-युद्ध! भाग लें रहें हैं—जगजीवन-रामकी नेतृत्ववाली कांग्रेस, निजलिंगप्पाकी नेतृत्ववाली कांग्रेस, जनसंघ, स्वतंत्र, शिवसेना वगैरे पार्टियोंके प्रतिनिधी.

"इंडिकेट इंडिकेट, हों जाव अभी आऊट गेट"

"सिंडिकेट सिंडिकेट, तुम्हारा खत्रा इंडिकेट."

"मुंबई कुणाची — शिवसनेची!

नाही, पाटलांची!

नाही, जॉर्ज सायबाची!

नाही, आगासकरांची!

नाही, डांग्यांची!

नाही...नाही... हो...हो...नाऽऽही ऽऽ...होऽहो...इंडि-सिंडी...शिवसेना... लालबावटा...जनसंघ...

"अग, अग, बंद कर बरं तो रेडिओ! फुटेल त्या गडगडाटात."

"अहो, काय बडबडताय तुम्ही? आधी नीट जागे व्हा पाहू!" सौ. गदागदा हालवीत म्हणाली. उठून बघतो तो मध्यरात्र होती. रेडिओ अगदी निपचित पडला होता. एकूण हा सगळा कालच्या बातमीचा परिणाम होता तर. आकाशवाणीवरून म्हणे राजकीय पक्षांना प्रचार करायला संधी मिळणार होती.

अर्थात अशा कार्यक्रमांना विविध-भारती शिवाय दुसरं कुठलं चांगलं माध्यम? विविध-भारतीवरचा कार्यक्रमांचा सिक्वेन्स ओघानंच पुढील प्रमाणे येणार—

सायंकाळी ६ वाजता— प्रथम सिनेसंगीत.

"यूं तो हमने लाख हंसी देखा है...

राजकीय पक्षाचा प्रचार— इंडिकेट.

अॅस्प्रो लिजिये!

"मेरा नाम जोकर— प्रोग्राम.

राजकीय पक्षाचा प्रचार— सिंडिकेट.

सरदर्द? आवेदन!

भगवान परशुराम—प्रोग्राम.

राजकीय पक्षाचा प्रचार—जनसंघ.

हॉर्लिक्स गिव्हज यू एक्स्ट्रॉ एनर्जी!

"सरपर टोपी, लाल हाथमे रेशमका रुमाल.

राजकीय पक्षाचा प्रचार—कम्युनिस्ट.

ओरडून ओरडून घसा बसला ? लिजिये, पीजिये फॅन्टा ऑरेंज !
" नन्हे मुन्हे बच्चे तेरे मुठ्ठीमे क्या है...
राजकीय पक्षाचा प्रचार– शिवसेना.
डोंगरे बालामृत लिजिये !
वगैरे वगैरे.

अर्थात असा प्रचार चालू झाल्यावर सगळ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एक मात्र जरूर केलं पाहिजे. व्याख्यानं, घोषणा, रेडिओ कार्यक्रम ऐकणाऱ्या, वृत्तपत्रातनं प्रचार-साहित्य वाचणाऱ्या लक्षावधी मतदारांना अॅस्प्रो, अॅनासिन वगैरे फुकट पुरवलं पाहिजे !

□ □ □

---

## गुजरातचे रागरंग

पृष्ठ १७ वरून

आणि म्हणूनच गुजरात आज हताश झाला आहे.
एरवी हताश झाला नसता.
पण—
मानवी मनच वेडे असते, हेच खरे.
माणसाप्रमाणे पक्षासही लोभ वगैरे पंचमहारिपूंची भलतीच पीडा होऊन बसते.
जनसंघाचे उदाहरण देतो.

लोकसभेसाठी तीस जागा गुजरातेत आहेत. जनसंघ गुजरातेत सशक्त होत चालला आहे हे कबूल. पण किती सशक्त आहे ? एक जागा, दोन जागा—

पण जनसंघाने तेवीस जागांची मागणी केली !

त्यामुळे काँग्रेसवाल्यांची डोकी बिथरून गेली. मी काँग्रेसवाला असतो तर माझी तीच अवस्था झाली असती. त्यांनी सरळ विरोध केला. नुसता विरोध नाही तर एकही जागा त्यांना देणार नाही हे वर सुनावले.

मुद्यांवरुन गुद्यांवर आली वेळ.
अशाने मने दुखावतात व उगीच कटुता निर्माण होते.
आणि सारा अलायन्स आतून पोखरला जातो.

□ □ □

प्रभाकर पेंढारकर

यशवंत सहदेव गोसावी
एक कामगार
वय वर्षे एकोणीस
शिक्षण मराठी सातवी

# तोच उभा आहे कॅमेऱ्यासमोर...

पॅरिस.

युनेस्कोच्या अवाढव्य इमारतीच्या तळघरातलं छोटसं थिएटर.
कपाळाला आठ्या घातलेल्या, गंभीर चेहऱ्याच्या मिस् रूथ लॅंझरस,
भावनगरी, युनेस्कोचे पी. आर्. ओ. (फिल्मस्) आणि दोन अधिकारी,
(त्यांची नावे मला माहित नाहीत,) आणि मी !
भावनगरी म्हणतात, " डॉ. सक्सेना येऊ शकतील असं मला वाटत नाही.
आपण सुरुवात करू या ?"
" हो " म्हणणाऱ्या मिस् लॅंझरस पहिल्या.
अस्खलीत फ्रेंचमध्ये भावनगरी इंटरकॉमवरून ऑपरेटरशी बोलतात,
त्याला फिल्म सुरू करायला सांगतात.
न दिसणाऱ्या ऑपरेटरचा इंटरकॉममधून आवाज येतो, " दाक्कोर. "
दिवे मंद होतात.
स्क्रीनसमोरचा पडदा बाजूस होतो.
चित्र सुरू होते.
कोकणच्या किनाऱ्यावरील वाऱ्याबरोबर डोलणारे उंच माड.
सागराच्या पाण्याचा रंग गडद निळा.
मालवण...तेथून सहा मैलावर चौकं.
रस्ता सोडून आतल्या बाजूस आंबेरी.

अद्याप एस्. टी. न पोहोचलेलं एक खेडं.
छोटया होडीत वल्हं मारत असलेला यशवंत सहदेव गोसावी.
वय वर्षे एकोणीस.
शिक्षण मराठी सातवी.
कारण त्यापुढं गावात शाळाच नाही.
ह्या यशंवतची थोडीशी जमीन आहे.
भातशेतीची. वर्षातून सहा महिने रिकामी पडणारी.
काही माडाची झाडं आहेत.
यशवंत खारीसारखा सरसर माडावर चढतो. नारळ उतरवतो.
शेतात नांगर धरतो. आपल्या वडिलांना मदत करतो.
पण यशवंतचा भाऊ आता मोठा झालाय.
नुकताच नांगर धरू लागलाय.
एवढयाशा जमिनीच्या तुकडयावर वाढत्या कुटुंबाची गर्दी होऊ पहातेय.
यशवंतचा जीव आंबेरीच्या कुंपणात रहात नाही.
चौकं, मालवण आणि त्या पलीकडं मुंबई !
त्याचा उत्साह, उमेद, धडपडीची जिद्द साऱ्यांचं चीज होईल अशी जागा-मुंबई !
यशवंत एका सकाळी मुंबईत दाखल झाला.
दूरच्या एका नातेवाईकाकडं बिस्तरा टाकून नोकरीच्या शोधाला लागला.
नारळाच्या झाडापेक्षा उंच गिरण्यांची धुराडी.
कारखाने, गिरण्या, फॅक्टरी.
ह्यातून यशवंत वणवणू लागला.
दहा, पंधरा, वीस दिवस, महिना उलटला,
बरोबर आणलेले पैसे संपले.
तरीही नोकरी मिळेना.

माडांच्या झाडावर चढताना सर्कशीतल्या कसरतपटूला लाजवील असं कौशल्य इथं निरुपयोगी ठरलं. नांगर चालवायला मुंबईत जमीन आहेच कुठं ?

पहावं तिकडं इमारतींचं जंगल आणि त्या पलीकडं निळा निळा समुद्र !

ह्या अनोळख्या, परक्या, माणसांनी बुजबुजलेल्या निर्जन शहरात यशवंतला हा समुद्रच तेवढा आप्त होता.

नात्याचा काका त्याची माया केव्हाच आटली होती.
थकला भागलेला यशवंत समुद्रकिनारी संध्याकाळ घालवायला यायचा.
बुडणाऱ्या सूर्याकडं विषण्ण होऊन पहात रहायचा.

आजूबाजूला पसरलेली रंगीबेरंगी दुनिया, भेळपुरी, शेवगाठी, कुलफी-मलई खाण्यात मग्न असे.

भुकेल्या पोटी यशवंतच्या मनात भयानक विचार येत. त्याच्या गावाकडची कोकणातली त्याच्यासारखी उत्साही पोरं मुंबईला फुटपाथवर रहायला लागलेली त्यानं पाहिली होती. असेच दिवस चालले तर आपल्यावरही एक दिवस अशीच पाळी येणार...

" हुतूतू... हुतूतू..."

नावाड्यांच्या पोरांचा खेळ चालू असे.

यशवंतसारखीच तीही काळी-सावळी, मळक्या अंगाची, अर्ध्या चड्डीतली.

एक दिवस यशवंतला त्यांनी खेळात ओढलं.

त्या नावाड्यांना " हुतुतू हुतूतू " करत चपळाईनं येणारी यशवंतची मासोळी पकडता येईना. ती पोरं त्याच्या खेळावर बेहद्द खूष झाली.

तो त्यांचा सवंगडी बनला.

त्यांना जेव्हा समजलं की यशवंतला अद्याप नोकरी नाही, तेव्हा त्यांनी त्याला आपल्याबरोबर मासे पकडायला यायला बोलावलं.

पैसे फार नाहीत, पण दोन वेळा भरपूर भात व मासे, ओवरी झोपायला आणि " तू–आमच्यातलाच " ही मायेची वागणूक !

यशवंत कामाला लागला.

वरळीच्या खाडीत कोळ्याबरोबर खपू लागला.

पूर्वी स्वच्छ निळा समुद्र मोठा आकर्षक वाटायचा. आता तो पाणी गढूळ होण्याची वाट पाहू लागला. कारण गढूळ पाण्यात मासळी किनाऱ्याला येते. मासळीला गढूळ पाण्यात जाळं दिसत नाही. म्हावरं पकडणं सोपं होतं. पण यशवंतला ते पाण्यातलं काम झेपेना. सतत सर्दी होऊ लागली.

बारीक तापही !

मग कोळ्यांनी सांगितलं, " तू रहा इथंच, जेव आमच्याबरोबर, पण काम दुसरीकडं पहा. "

फिरून नोकरीचा शोध.

एम्प्लॉयमेंट एक्सचेंज समोरच्या रांगा, फॉर्मस्...नोंदणी... प्रतीक्षा...निराशा

एकच जिद्द–गावी परतणार नाही. इथंच नौकरी मिळवेन.

शेवटी मिळाली.

सांताक्रूझला खीरा स्टील वर्क्समध्ये !

हातगाडी ओढायची. सामान वाहून न्यायची !

शेतकऱ्याचा कोळी. आणि कोळ्याचा हमाल झाला.

आंबेरीची याद संध्याकाळच्या वेळी अस्वस्थ करी.

डुलणारे माड साद घालीत.

कुठं कोकणी बोली ऐकली की जीवाची घालमेल होई.

डोक्यावरून कानठळ्या बसवत जेट विमानं डोक्यावरून निघून जात आणि साऱ्या आठवणी विरून जात.

फॅक्टरीत चालणारं फर्निचरचं काम यशवंतला शिकायचं होतं. पण शिकवणार कोण? लेथ...कटींग मशीन...ड्रीलींग...वेल्डींग—हे सारं नोकरी करून शिकणं यशवंतच्या लेखी अशक्य होतं.

एक दिवस फोरमन यायला उशीर झाला. आलेल्या मजूरांची हजेरी यशवंतनं मांडली. प्रत्येक हजर माणसापुढं Present म्हणून लिहून ठेवलं.

फोरमननं ते पाहिलं. त्यानं शिफारस केली आणि यशवंत फॅक्टरीत मदतनीस म्हणून काम करू लागला.

'हेल्पर' ते 'फिटर' हा बराच लांबला पल्ला होता. महिने आणि वर्षं चालली होती. यशवंत हेल्परचा हेल्परच राहिला.

आणि एक दिवस यशवंतनं नोटीस बोर्डवर नोटीस पाहिली,

श्रमिक विद्यापीठातर्फे खीरामध्ये वर्ग सुरू होणार होते.

संध्याकाळी श्रमिक विद्यापीठाच्या प्रिन्सिपॉल दीक्षितनी कामगारांना ह्या वर्गाची माहिती सांगितली.

'कामावर असलेल्या कामगारांसाठी ही शिक्षणाची योजना.

तुम्ही जे काम करता तेच अधिक चांगलं, कमी कष्टात, कमी वेळात कसं व्यवस्थित करायचं हे शिकविण्यासाठी हे वर्ग.

तुमच्या गरजाप्रमाणं शिक्षणक्रम आखला जाईल.

त्या त्या विषयातले उत्तमोत्तम शिक्षक, इंजिनिअर, सुपरवायझर तुमच्या मातृभाषेत शिकविण्यासाठी येतील.

शिक्षण आणि जीवन ह्यांची सांगड घालण्याचा हा प्रयत्न!'

सारंच नवीन होतं.

ह्या श्रमिक विद्यापीठाची वरळीची कचेरीही फारशी मोठी नाही.

कारण कामगारांना शाळेत बोलाविण्याऐवजी शाळाच ते कामगारापर्यंत घेऊन जातात. कँटीन, डायरेक्टरांची बोर्ड मिटींग रूम, किंवा लायब्ररीकरिता ठेवलेला हॉल...कुठंही रिकाम्या जागेत वर्ग चालत.

फॅक्टरी सुटल्यावर तेथल्याच रिकाम्या मशीनवर प्रॅक्टीकलचे धडे.

मातृभाषेत, सोप्या शब्दात साइक्लोस्टाईल केलेल्या नोट्स.

तेवढ्या वाचल्या की घरी अभ्यासाची जरूर नाही.

यशवंताचं मन अभ्यासात प्रथमच गुंगलं.

दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल असं शिक्षण आयुष्यात प्रथमच त्याला मिळत होतं.

यशवंत भरभर प्रगती करत होता.

कोर्स संपला.

ह्या चार महिन्यात त्याचा आत्मविश्वास वाढला होता. पूर्वी सुपरवायझर सांगेल त्याची आंधळी नक्कल होती. आता कोणतं काम कसं व का करायचं हे यशवंतला समजू लागलं होतं.

खीरामध्ये एकदम नव्या आलेल्या ऑर्डरी पूर्ण करण्याकरिता काही फिटर्स नेमायचे होते. फोरमननं शिफारस केलेल्या यादीत यशवंताचं नाव पहिलं होतं.

यशवंत फिटर झाला.

'मी जे केलं ते तुम्हीही करू शकाल.

श्रमिक विद्यापीठाला त्याचं श्रेय आहे.

तुम्हीही तुमचं नाव श्रमिक विद्यापीठात दाखल करा आणि स्वतःची प्रगती साधा!'

यशवंतच्या ह्या शब्दावर चित्र संपलं.

फिरून दिवे लागले.

आंबेरीहून आम्ही परत पॅरिसला आलो.

इतका वेळ बोलणारा रंगीबेरंगी पडदा फिरून सफेद आणि अबोल झाला.

एक विचित्र शांतता प्रेक्षागारात पसरली.

एक दोन क्षण तसेच गेले. मग भावनगरींनी सुरुवात केली,

'Good! This Yashawant's life story appears to be quite interesting.

Let us have your comments first!'

त्यांनी पी. आर. ओ. कडे पाहिलं.

पी. आर. ओ. (फिल्मस्) उठले. त्यांची उंची सहा फूटापेक्षा अधिक होती. भरलेली देहयष्टी. गंभीर आवाज.

माझ्याजवळ येत ते म्हणाले,

'पेंढारकर, सॉरी...मला दुसऱ्या एका मिटींगला जायचं आहे.

तेव्हा माझं मत एका मिनिटात सांगून जातो.

वाईट मात्र वाटून घेऊ नकात.

एक दिवशी संध्याकाळी तुम्ही घरी यायला निघता.

तुमची गाडी लगेच सुरू होते.

पोलीस तुम्हाला इतराअगोदर रस्ता देतो.

घरी तुमची पत्नी दारात वाट पहात उभी.

दोन्ही हात पसरून तुम्हाला मिठीत घेते.

तुमचे चुंबन घेते. (तुम्ही काहीही भेट आणलेली नसताही!)

आत येतां, टेबलावर पत्र असते.

तुम्हाला एकदम दोन इन्क्रीमेंटस् देण्यात आल्या आहेत.
आणि हे सर्व का घडलं माहित आहे ?
आजपासून तुम्ही व्हिटॅमिनच्या गोळ्या खायला सुरुवात केलीत-ना.
त्यांचा प्रभाव आहे हा !
व्हिटॅमिनची गोळी–श्रमिक विद्यापीठ.
Do you get me Pendharkar ?'
मी मान डोलावतो. 'बाय् बाय्' म्हणत पी. आर. ओ. निघून जातात.

भावनगरी विचारतात–' ह्या श्रमिक विद्यापीठानं आतापर्यंत किती कामगारांना शिक्षण दिलं ? साधारण पाचशे, सहाशे, एवढ्यांच ना ?

आणि अशा शिक्षणाची गरज असणारे आज किती कामगार मुंबईत असतील ? –तीन लक्ष, चार लक्ष, पाच लक्ष.

पाचशे शिक्षित–चार लक्ष ह्या शिक्षणाची गरज असणारे–
ह्यावर फिल्म का नाही संपवत ?'
मी परत मान डोलावतो. पण ह्याखेपी रहावत नाही म्हणून सांगतो.

'That is not what Department of Adult Education of UNESCO wanted.

आता फिल्ममध्ये आहे तसा शेवट असावा ही सूचना आपल्याच एज्युकेशन डिपार्टमेंटची ! वाटलं तर मिस् लॅंझरस स्वतःच सांगतील.'

मग भावनगरी आणि मिस् लॅंझरस ह्यांची चर्चा.

दोन वेगवेगळ्या पिढीत असणार नाही एवढी गॅप एकाच संस्थेच्या दोन शाखांमध्ये असते.

भारतात, तशीच फ्रान्समध्येही !
मी आता प्रेक्षकाची भूमिका करतो आहे.

लॅंझरस सांगतात, 'पण श्रमिक विद्यापीठ म्हणजे केवळ तांत्रिक शिक्षण देणारी संस्था नव्हे. कामगार हा चांगला कामगार व्हावा ह्याइतकेच, किंवा त्यापेक्षा महत्त्वाचे हे की तो चांगला नागरिक व्हावा. विद्यापीठाचं ते उद्दिष्ट आहे.'

'यशवंत चांगला नागरिक कसा झाला हे ह्या चित्रात दिसत नाही.'
"म्हणजे काय ?"

"म्हणजे असं, आज यशवंताच्या पुढं जे प्रश्न आहेत ते लंडनमध्ये, पॅरिसमध्ये, न्यूयॉर्क आणि शिकॅगो येथे खेड्यातून येणाऱ्या सर्वच अकुशल कामगारांचे आहेत. हे यशवंत भारतातच नाहीत, सगळ्या जगभर विखुरलेत. त्यांना कोणती ना कोणती तरी नोकरी मिळते. कसे तरी त्यांचे गाडे चालू होते. महत्त्वाचा प्रश्न हा की ते त्यांना मिळणारे पैसे वापरतात कसे ?

श्रमिक विद्यापीठात सर्वांगीण प्रगतिकरता शिक्षण घेतलेला यशवंत हेल्परचा

फिटर झाला. त्याच्या वेतनात फरक पडला हे, मिळणारे अधिक पैसे त्यानं कसे वापरले ?"

"कसे ?"

"तो प्रथम चाळीत रहात होता. नंतर चांगल्या स्वच्छ जागी रहायला गेला." (मुंबईत नवी, स्वच्छ जागा ?)

"किंवा त्यानं एखादी स्कूटर घेतली."

(स्कूटर ?

फिटर जाऊ दे, असे पन्नास फिटर ज्याच्या हाताखाली काम करतात त्या इंजिनिअरला देखील स्कूटर घेणं ही गोष्ट तितकीशी सोपी नाही.) मी लँझरस-बाईंना नम्रतेनं सांगतो,

"आपण जे म्हणता ते भारतात घडण्याजोगं नाही !

"मग जे भारतात घडेल ते दाखवा.

काय आणि कसं दाखवायचं हा तुमचा प्रश्न. पण तो चांगला नागरिक झाला हे चित्रात हवं !"

चर्चा संपली.

मी भारतात परतलो. यशवंतला भेटलो.

तो सांगतो आहे, "हेल्पर होतो तेव्हा मला वर्षाला साडेपाच रुपये पगार वाढ मिळायची.

फिटरचा हेल्पर झालो तसा माझा पगार साडेसोळा रुपये एकदम वाढला.

पण मी पूर्वीच रहात होतो त्याच चाळीत रहातोय्.

जे जेवण जेवत होतो तेच आताही जेवतोय्, त्याच कँटीनमध्ये !

लोकलनं, थर्डक्लासनंच कामाला जातोय्.

एक पँट आणि दोन शर्ट नवे शिवले. ते सोडले तर बाकी सगळं आहे तेच आहे !"

"मग मिळणाऱ्या अधिक पैशाचं काय करतोस ?"

यशवंत गप्प आहे.

"सिनेमा ?"

यशवंत 'नाही' म्हणून मान हालवतो.

"नाटकं ?"

"नाही !"

मग तोच सांगू लागतो.

"खरं सांगू–प्रायव्हेट आहे, पण सांगायला हरकत नाही.

मी बायकोला दागिने करतोय्."

मी चकित झालो. "दागिने ?"

" होय !
लग्न होऊन पाच वर्षं झाली. बायको आंबेरीला, मी इथं.
वर्षातून एक महिना गावी जायला मिळतं.
टेंपररी होतो तेव्हा रजा मिळे ती बिनपगारी.
वर्षभर पैसे साठवायचे, मे महिन्यात रजा घेऊन गावी जायचं.
परत येताना बायकोच्या डोळ्याचं पाणी पुसता पुसता पुरेवाट होई.
तिला मुंबईला आणता येणं अशक्यच. जागा कुठं मिळणार ?
मी तिची समजूत घातली की दर वर्षी मी तुला एक दागिना देईन.
पहिल्या वर्षी माडाची झाडं लावली, काही हापूसची कलमंही !
पुढच्या वर्षी घराची दुरुस्ती.
मग गुरासाठी मांगर बांधलं.
एका वर्षी विहिरीची दुरुस्ती पूर्ण केली.
हे एकेक दागिने.
बायकोसाठी !
मुंबईत रहातोय तोवर पैसा मिळतोय्.
आता घराला लाईट घ्यायचा आहे.
बहिणीचं लग्न करायचंय्.
आणि छोटीशी जमीन घेतली त्याचं कर्ज फेडायचं आहे.
हे सगळे दागिने पुरे झाले की मुंबईला रामराम ठोकणार.
बायका मुलांच्यात रहायला गावी जाणार ! "

—मी, खोसला, सीताराम, भास्कर फिल्मस् डिव्हीजनचं युनिट फिरून यशवंत बरोबर आंबेरीला चाललंय्...भारतातला एक कामगार मिळणारी वेतन वाढ कशी खर्च करतो ह्याचं चित्रण करण्यासाठी.

' डॉक्यूमेंटरी भारताबाहेर आणखीच चार देशात प्रकाशित व्हायची आहे. शक्य तितक्या लवकर काम संपवा." असं लॅझरसबाईंचं कालच पत्र आलंय्. मला सारखं वाटतय्, त्या आमच्याबरोबर यशवंतच्या बायकोचे दागिने पहायला यायला हव्या होत्या !





# पर्ल हार्बर

लेखांक : सहा

विनय कुबेर

हल्ल्याच्या पहिल्या फेरीत जपान्यांनी एकूण १८३ विमाने लोटली। ५१ सूरमारी बॉंबर्स, ४९ उंचावरून बॉंबफेक करणारी विमाने, ४३ लढाऊ विमाने आणि ४० टारपेडोफेकी विमाने अशी त्यांची वर्गवारी होती. चिनी युद्धात गाजलेला योद्धा फुशिडा या विमानांचे नेतृत्व करीत होता. आकर्षक व्यक्तिमत्वाचा फुशिडा सर्वांचा प्यारा नेता होता. त्याचे सहकारी त्याच्या आज्ञेनिशी मृत्युमुखात उडी घेण्यास सिद्ध असत. सहकाऱ्यावरील या हुकमतीचा १० वर्षांनंतर फुशिडाला

एका आगळ्या प्रकारे उपयोग झाला. त्याने त्याची दुधारी तरवार म्यान केली आणि ख्रिश्चन धर्मगुरू होऊन खऱ्याखुऱ्या शांतिदूताची भूमिका मनापासून पार पाडली! सात डिसेंबरच्या या सकाळी मात्र त्याच्यातील सैतान जागा झाला होता. प्रचंड मनुष्यहानी व विध्वंस करण्यासाठी तो स्वतःची बुद्धी पणास लावीत होता.

आजच्या तंत्रदृष्ट्या पुढारलेल्या विमानांशी फुशिडाच्या दलातील विमानांची तुलना होऊच शकत नाही! त्याची विमाने अत्यंत मागासलेली, मंदगतीची आणि फुसकी होती. त्यांचा कमाल वेग ताशी फक्त २००.मैल होता. एकावेळी फक्त एकच बाँब टाकण्याची सोय त्यात होती. चिलखती कवच, व अभेद्य (Self sealing) तेल टाक्यांचे संरक्षण त्यांना उपलब्ध नव्हते. त्यांचे सर्वात प्रभावी शस्त्र त्यांच्या कॉकपिटमध्ये होते! जपानच्या सागरी विमानदलातील अत्यंत तरबेज वैमानिक त्यांचे नियंत्रण करीत होते. सर्वोत्कृष्ठ शिक्षण व युद्धांचा प्रदीर्घ अनुभव यामुळे याक्षणी ते जगात अजिक्य ठरले!

दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी जपानी तंत्रज्ञांनी 'झीरो' ही लढाऊ विमाने नव्यानेच तयार केली होती. या विमानांचे नियंत्रण करणारे वैमानिकही अद्वितीय असेच होते. झीरो फायटर्सना कसलेही संरक्षक पोलादी कवच नव्हते. परंतु त्याच्या दोन्ही पंखात २० मिलिमीटर व्यासाची एक एक तोफ बसविलेली असे. आणि नाकात ७·७ मिलिमीटर व्यासाच्या दोन मशिनगन्स असत. ही चारी प्रभावी शस्त्रे जेव्हा आग ओकीत तेव्हा प्रत्यक्ष मृत्यूचा जबडा उघडल्याचा भास होई. या विमानांची चपलता आणि झटपट उंच चढण्याची क्षमता पाहून अमेरिकन वैमानिकही आश्चर्यचकित झाले.

जपान्यांच्या टारपेडोफेक्या विमानांचे नेतृत्व चिनी युद्धातील प्रसिद्ध वीर लेफ्टनंट कमांडर मुराटा करीत होता. या विमानांची कामगिरी सर्वात जास्त विध्वंसक ठरली. नौदलाच्या अकादमीत शिक्षण घेत असता मुराटाची गणना मंदबुद्धी विद्यार्थ्यात होई. पुस्तकी अभ्यासात त्याची फारशी गती नव्हती. विमानोड्डाणाचे प्रात्यक्षिक शिक्षण घेताना मात्र त्याला त्याचे क्षेत्र गवसले! मुराटा अगदी स्पष्टवक्ता आणि कुर्रेबाज मनुष्य होता. परंतु वेळप्रसंगी त्याची विनोदी वृत्ती कारंज्यातील पाण्यासारखी थुई थुई नाचत उफाळून येई. काटक प्रकृतीचा, चपळ शरीराचा, देखणा मुराटा नौदलाच्या अभिमानाचा विषय होता. कच खाणे त्याच्या स्वभावातच नव्हते! २६ ऑक्टोबर रोजी त्याने सांताक्रूझ बेटाजवळ एका अमेरिकन जहाजावर गाजलेला टारपेडोहल्ला चढविला. याप्रसंगी त्याच्यावर मृत्यूची झडप पडली! त्यादिवशी अखेरच्या रणांगणावर जातानाही त्याचा आत्मविश्वास अढळ होता!

पर्ल बंदरावरील चढाईच्या नियोजित आराखड्यात एका किरकोळ गफलती-

मुळे थोडीफार गडबड उडाली. हल्ल्याच्या प्रसंगी होनोलुलू रेडिओवर नित्याचे लोकप्रिय संगीतच वाजविले जात होते. शिवाय पुढे गेलेल्या दोन टेहेळणी विमानांनीही अमेरिकन सैन्य गाफील असल्याचा संदेश दिलेला होता. त्यामुळे फुशिडाने, 'हल्ल्याची आकस्मिकता साध्य झाली आहे. ठरल्याप्रमाणे हल्ल्यास प्रारंभ करा' असा संदेश आपल्या वैमानिकांना देण्यासाठी ठरलेला खुणेचा एक बार काढला. अशा खुणेनंतर प्रथम टारपेडोफेक्या विमानांनी हल्ल्याला प्रारंभ करायचा होता. बॉम्बर्सनी प्रथम चढाई केल्यास बाँबस्फोटांचा धूर व जहाजावरून प्रतिकारासाठी होणारा गोळीबार यामुळे नंतर येणाऱ्या टारपेडोफेक्या विमानांना त्याची लक्ष्ये स्पष्ट दिसली नसती आणि त्यांचे काम अवघड झाले असते. म्हणून प्रथम टारपेडोफेक व नंतर बाँबफेक असा क्रम योजण्यात आला होता. अमेरिकन सैनिक सावध असल्यास मात्र त्यांना जपान्यांच्या विचित्र, मंदगती टारपेडोफेक्या विमानांचा वेध घेणे शक्य झाले असते. म्हणून त्या परिस्थितीत प्रथम बाँबर विमाने बाँबफेक करून जहाजावरील तोफा बंद पाडणार होती व त्यानंतर टारपेडोफेकी विमाने त्यांची कामगिरी करणार होती. या दुसऱ्या प्रकारच्या हल्ल्याला प्रारंभ करण्याचा हुकूम फुशिडा दोन खुणेचे बार काढून देणार होता. फुशिडाने खुणेचा एकच बार काढून दिलेला पहिल्या प्रकारच्या चढाईचा हुकूम एका लढाऊ विमानपथकाच्या नेत्याला ढग आड आल्यामुळे समजला नाही. त्यामुळे त्याने या खुणेला प्रतिसाद दिला नाही. म्हणून त्याचे लक्ष्य वेधण्यासाठी फुशिडाने आणखी एक खुणेचा बार काढला. त्यामुळे घोटाळा झाला. सूरमाऱ्या बाँबर विमानांचा नेता लेफ्टनंट कमांडर ताकाहाशी याला वाटले की, दोन बार काढून फुशिडाने अमेरिकन सावध असल्याचे सांगितले आहे. तेव्हा हल्ला दुसऱ्या पद्धतीनुसार करायचा आहे. ताकाहाशी त्याच्या बाँबर विमानांच्या पथकासह पुढे घुसला ! त्याचा हा गैरसमज टारपेडोपथकाचा नेता मुराटा याच्या ध्यानात आला. परंतु या वेळेपर्यंत ताकाहाशी हल्ल्याच्या पावित्र्यात वेगाने लक्ष्यावर झेपावत होता. त्यामुळे मुराटाला त्याच्या विमानपथकासह बाजूस निसटावे लागले !

परंतु या गडबडीमुळे कुठल्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. या दोन्ही पथकांपैकी कोणासही अमेरिकनांकडून प्रतिकार झाला नाही. हे परस्परविरुद्ध सिग्नल दिल्यापासून तो पहिला बाँब जहाजावर पडेपर्यंत दोन मिनिटे शांततेत गेली. अमेरिकन सैन्य अजूनही गाफील असल्याचाच हा पुरावा होता. विमानाखालून गालिच्याप्रमाणे उलगडत जाणाऱ्या दृश्याने फुशिडाचा उत्साह द्विगुणित झाला. सकाळच्या कोवळ्या उन्हात पर्ल हार्बर सुखाने न्हात होते. अमेरिकन लढाऊ व बाँबर विमाने त्यांच्या तळावर ओळीत उभी होती. बालमंदिरात विमानतळाच्या दृष्यात मांडून ठेवलेल्या बनावट विमानांइतकीच ती निरुपद्रवी ठरणार होती. सैनिकी हालचालींचा आसपास मागमूसही नव्हता.

फुशिडाला हा मोठाच शुभशकून वाटला. जपानचे उगवत्या सूर्याचे मानचिन्ह अपूर्व तेजाने तळपून त्याच्या डोळ्यांना दिपवीत होते !

## व्हीलर तळावरील रणकंदन !

जपानी दलातील सर्वच्या सर्व सूरमारी बाँबर्स व फायटर्सनी अमेरिकन विमानांचा फडशा पाडण्याची कामगिरी करायची होती. जहाजावर पहिला बाँब पडताक्षणी हे पथक इतरांपासून फुटले. त्यांनी व्हीलर, व्हिकॅम व फोर्ड बेटावरील विमानतळ व इतर लष्करी उपयोगाच्या इमारतींवर चढाई केली.

व्हीलर विमानतळ हा अमेरिकनांच्या पी–४० व पी–३६ जातीच्या विमानांचा सर्वात मोठा अड्डा होता. तेथील विमानांची संख्या फुशिडाच्या कल्पनेतील संख्येच्या दुप्पट होती. मुख्य अधिकारी कर्नल फलड याने या विमानांच्या सुरक्षिततेसाठी चांगली सोय केली होती. 'यू' या इंग्रजी अक्षराच्या उलट्या आकाराची मातीने बांधकाम केलेली सुमारे १०० विमानगृहे तयार होत आली होती. या विमानगृहांची उंची १० फूट होती. सर्व अमेरिकन विमाने त्यात सुरक्षित राहू शकली असती परंतु जनरल शॉर्टने फलडच्या नाराजीकडे दुर्लक्ष करून ही विमाने बाहेरच ठेवली होती. त्याला स्थानिक जपान्यांच्या घातपाती कारवायांची भीती वाटे. विमानगृहासमोरील पटांगणात ही विमाने एकमेकांना चिकटून उभी होती. सभोवती सशस्त्र पहारेकऱ्यांचा दक्ष पहारा चोवीस तास चालू होता.

८ वाजण्याच्या सुमारास २५ सूरमारी बाँबर विमाने व्हीलर विमानतळावर चालून गेली. विमानगृहे एका ठिकाणी जमवून ठेवलेले विमानांचे समूह, सैनिकांच्या बरॅक्स इत्यादीवर घिरट्या घालीत त्यांनी बाँबफेक सुरू केली. थोड्याच वेळात 'झीरो' फायटर्स त्यांच्या मदतीस आली. दोघांनी मिळून व्हीलर हवाई तळाचा विध्वंस आरंभिला. कित्येक वेळा ती अगदी खालून सूर मारीत. इतकी की, युद्धानंतरच्या तपासणीत जपानी विमानांच्या चाकात टेलिफोन व विजेच्या तारांचे तुकडे अडकलेले आढळले ! अमेरिकन विमानांच्या समूहातील एखाद्यावर जरी मारा झाला तरी तो सर्व विमानाच्या नाशाला कारणीभूत ठरे. मारा झालेले विमान एकदम पेट घेई आणि त्याच्या लवलवत्या ज्वाला शेजारच्या विमानालाही आग लावीत. अशा तऱ्हेने समूहातील सर्वच विमाने अग्निप्रलयात वेढली जात. विमानगृहासमोर आगीचा अखंड प्रवाहच सुरु झाला !

बहुतेक सर्व जपानी वैमानिकांनी या युद्धातून जगण्यावाचण्याचीही आशा सोडली होती. बाँबर विमानांच्या एका पथकाचा नेता लेफ्टनंट एमा यानेही आदल्या रात्री इतरांप्रमाणे स्वतःचे मृत्यूपत्र तयार करून ठेवले. आपली सुंदर तरुण पत्नी व एक महिन्याची कन्या आपल्याला पुन्हा भेटेल असे त्याला वाटत नव्हते. युद्धप्रसंगी प्रतिकारासाठी चालून येणारी अमेरिकन विमाने व खालून होणारा विमानविरोधी तोफांचा तुफान मारा यांना चुकवीत आपल्याला झुंजावे लागेल अशी त्याची कल्पना

होती. परंतु हवाईमधील रणसंग्रामात अमेरिकन विमाने त्याला आकाशात भेटलीच नाहीत. विमानविरोधी तोफांचा माराही अगदी तुरळक होता. प्रत्येक वैमानिकाने त्याच्या लक्ष्यावरून तीन-चार फेऱ्या मारल्या. तरीही व्हीलरवर एकही जपानी विमान पाडले गेले नाही. लेफ्टनंट एमाला अंगावरील केस भीतीने ताठ उभे करणारा भयंकर रणसंग्राम अनुभवायला मिळालाच नाही! हवाईचे युद्ध त्याला सरावाच्या युद्धासारखेच भासले!

ब्रिगेडियर डेव्हिडसन बाथरुममध्ये दाढी करीत असता बॉम्बवर्षाव सुरु झाला. गडबडीने दाढी उरकून तो बाहेर पडेपर्यंत जपानी विमानांची व्हीलरवरील चढाई ऐन रंगात आली होती. हिरवळीवरील दृश्य पाहून डेव्हिडसनच्या तोंडचे पाणीच पळाले! हल्लेखोर विमानांवर खालून होणाऱ्या गोळीबाराने जी आतषबाजी दिसत होती ती पाहून त्याच्या १० वर्षांच्या दोन जुळ्या मुली आनंदाने बागडत टाळ्या पिटीत होत्या! या विमानातून मोकळी काडतुसे व इतर ठिकाणाहून अनेक चमकत्या धातूच्या तुकड्यांचा पाऊस हिरवळीवर पडत होता. या जुळ्या बहिणी या अद्‌भुत वस्तू गोळा करण्यात दंग होत्या. त्यांना धोक्याची यत्किंचितही जाणीव नव्हती! डेव्हिडसनने या दोघींना त्यांच्या मनाविरुद्ध घरात खेचून नेले व पत्नीच्या स्वाधीन केले. त्यानंतर त्याने प्रतिकारासाठी मुख्य ठाण्याकडे धाव घेतली! तेथे पोचल्यावर त्याने जोरजोराने ओरडून बचावलेली विमाने आगीपासून दूर नेण्याचे हुकूम सोडले.

पर्ल हार्बरच्या शोकांतिकेची चौकशी करणाऱ्या रॉबर्ट कमिशनपुढे डेव्हिडसनने सांगितले, "आमच्या तोफात दारुगोळा भरलेला नव्हता. तो जेथे साठवून ठेवला होता त्या विमानगृहाने दारुगोळ्यासह पेट घेतला होता. त्यामुळे आम्हास आमच्या तोफांचा उपयोग करता आला नाही."

हल्ला संपेपर्यंत कित्येक विमानगृहांची पार राखरांगोळी झाली! त्यांचे मोडतोड झालेले भेसूर सांगाडेच तेवढे उरले. अनेक बॉंब सैनिकांच्या बराकीत घुसून फुटले! शेकडो सैनिक जागच्या जागी ठार झाले! कित्येकजण भयंकर जखमी झाले. जखमातून रक्तस्त्राव होत असता तीव्र वेदनांमुळे कण्हत ते बराकीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होते. तशा परिस्थितीतही त्यांची एकमेकांना वाचविण्याची व जखमींना मदत करण्याची धडपड सुरू होती.

व्हीलर विमानतळावरील सैनिक क्षुब्ध व गोंधळलेले होते. परंतु बॉंब व गोळ्यांच्या वर्षावातही त्यांनी व त्याच्या अधिकाऱ्यांनी प्रतिकाराची शर्थ केली. परंतु त्यांचे प्रतिकाराचे यत्न एकांगी ठरले. जपानी बॉंबर्स व लढाऊ विमानांनी त्यांची विध्वंसाची कामगिरी संपवून पोबारा केल्यानंतर व्हिलर विमानळावर सगळीकडे विनाशाचे व मृत्यूचे हृदयविदारक दृष्य दिसत होते. धुराचे उसळते लोट आकाशात चढून वाऱ्याबरोबर पश्चिमेकडे वाहू लागले. मोठमोठ्या विमानांचे मोड-

शोड झालेले जळते सांगाडे इतस्ततः पसरलेले होते. या तळावरील पी–४० व पी–३६ विमानांपैकी एक तृतीयांशाहून अधिकांचा जपान्यांनी पिट्टा पाडला !

हिकॅम विमानतळावरील सैनिकही हल्ल्याच्या वेळी बेसावधच होते. तिथे ७० बाँबर विमाने होती. त्यापैकी १२ विमाने बी–१७ डी या जातीची होती. या चार इंजिनांच्या 'उडत्या किल्ल्यांची' जपान्यांना फार दहशत वाटे. त्यांचा पल्ला फार मोठा व विध्वंसक शक्तीही जबरदस्त होती. ही विमानेही विमानगृहासमोरील पटांगणात एकमेकांना चिकटून उभी होती. हे 'उडते किल्ले' जमिनीवरून उडालेच नाहीत. त्यामुळे जपान्यांना त्यांचा काहीही उपद्रव झाला नाही.

सकाळच्या प्रसन्न शांत वातावरणात एकाएकी विमानांच्या इंजिनांची कानठळ्या बसविणारी आरोळी घुमली ! उत्तरेकडून जपानी विमानांचा ढगासारखा मोठा जथा आला. त्यातील पुढची नऊ विमाने इतरांपासून फुटली. सूरमाऱ्या विमानांचे हे पथक हिकॅम विमानतळावर तुटून पडले.

हवाईतील अमेरिकन विमानदलाचा प्रमुख मेजर जनरल मार्टिन याने त्याचे मुख्य ऑफिस नुकतेच हिकॅम तळावर हलविले होते. त्याचा दुय्यम अधिकारी कर्नल मोलिसन हा अत्यंत कर्तबगार व लोकप्रिय अधिकारी होता. हल्ला चालू झाल्यावर गडबडीने पोशाख चढवून तो कचेरीत धावला. तिथून त्याने जनरल शॉर्टचा दुय्यम अधिकारी कर्नल फिलिप्स याच्याशी फोन जोडला. हिकॅम वैमानिक तळावर जपानी विमाने हल्ला करीत असल्याची वार्ता त्याने फिलिप्सच्या कानावर घातली. परंतु फिलिप्सचा त्यावर विश्वास बसेना. त्याने मोलिसनला धुडकावूनच लावले !

तो फोनवर ओरडला, 'अरे, तू शुद्धीवर आहेस का ? जागा हो ! जागा हो !'

असहाय्य झालेल्या मोलिसनने रागाने व निराशेने दातओठ चावले ! बाँबस्फोटाचे आवाज फिलिप्सच्या कानावर पडावेत म्हणून त्याने फोन तसाच धरून ठेवला.

तरीसुद्धा फिलिप्सची खात्री पटेना. तो समजावणीच्या सुरात मोलिसनला म्हणाला, "मग मी काय करावं असं म्हणणं आहे तुझं ? जरा थांब, मी तुझ्या मदतीस एकजण पाठवतो !"

अगतिक झालेल्या मोलिसनच्या मदतीसाठी याक्षणी वरून छप्पर कोसळले !

मोलिसन नंतर १०–१५ मिनिटांनी जनरल मार्टिन ऑफिसमध्ये पोचला व त्याच्या वरच्या मजल्यावरील खोलीत जाण्यासाठी जिन्याकडे वळला. मुद्दाम खाली थांबलेल्या मोलिसनने त्याला गडबडीने थांबविले.

तो म्हणाला, "जनरल, वर जाऊ नका. तिथं जाण्यात फार धोका आहे. इथं खाली आपल्या व शत्रूच्या दरम्यान निदान दोन मजले तरी आहेत !"

मोलिसनची सदिच्छा जाणून मार्टिन तळमजल्यावरच थांबला.

मोलिसनला जनरल मार्टिनबद्दल फार चिंता वाटत होती. चिरचिऱ्या प्रकृतीचा

मार्टिन त्या दिवशी आजारीच होता. पोटातील जुना अल्सर चिघळून त्याला असह्य वेदना होत होत्या. त्याचा चेहरा काळवंडला होता आणि डोळे खोल गेले होते. या आकस्मिक विमानहल्ल्यामुळे त्याला मोठा धक्का बसलेला स्पष्ट जाणवत होता. परंतु मार्टिन मनाने कितीही खचला असला तरी त्याच्या कर्तव्यास पुरेपूर जागला.

रॉबर्ट कमिशनला त्याने सांगितले की, जपानी विमानवाहू जहाजांचा शोध लावणे हे काम त्याक्षणी त्याच्यामते सर्वात महत्त्वाचे होते. एक नव्हे तर अनेक विमानवाहू जहाजांवरील विमाने पर्ल हार्बरवर हल्ला चढवीत आहेत याचा अंदाज त्याला आला होता. सत्यपरिस्थितीची त्याला अचूक जाणीव झाली होती ही गोष्ट वाखाणण्याजोगी होती.

तो पुढे म्हणाला, "जपानी आरमाराच्या शोधाचे काम नौदलाचे होते. म्हणून मी सागरी विमानदलप्रमुख रिअर ॲडमिरल बेलिंजर याला फोनवर बोलाविले. बाँबस्फोटांच्या आवाजामुळे आम्हाला एकमेकांचे बोलणे धड ऐकूही येत नव्हते. जपानी जहाजांवर हल्ला करण्यासाठी कोणत्या दिशेला जायचे याबद्दल बेलिंजर कसलीही माहिती देऊ शकला नाही."

बेलिंजरला जपानी आरमाराचे स्थान जरी ठाऊक असते तरीही त्याला काही करता येणे अशक्य होते. मार्टिन अगर बेलिंजर यापैकी कोणाकडेही जपान्यांना आव्हान देण्याइतकी विमाने लढाईनंतर शिल्लक उरलेली नव्हती !

आठ महिन्यापूर्वी या जोडीने तिच्या अहवालात वर्तविलेले भविष्य आज तंतोतंत खरे ठरलेले होते. "पर्ल बंदरासभोवतीच्या तीनशे मैलाच्या कक्षेत गुप्तपणे येऊन जपानच्या सहा विमानवाहू जहाजावरील विमाने पर्ल बंदरावर हल्ला चढवितील." ही शक्यता त्यांनी पूर्वीच जाहीर केली होती. अशा चढाईचा प्रतिकार करता यावा, जपानी जहाजांचा वेळीच छडा लावता यावा यासाठी टेहेळणीच्या कामासाठी लांब पल्ल्याच्या सागरी विमानांची मागणी त्यांनी प्रमुखांकडे केली होती. परंतु त्यांनी मागविलेली विमाने त्यांना शेवटपर्यंत देण्यात आली नाहीत. परिणामी त्यांचे भविष्यकथन कवडीमोल ठरले !

## शूरांचा प्रतिकार

ॲडमिरल बेलिंजरच्या सागरी टेहेळणी विमानांपैकी फार फार तर दोन-तीनच उड्डाणास योग्य स्थितीत राहिली. मोडतोड झालेल्या विमानांच्या दुरुस्तीस ताबडतोब प्रारंभ करणेही शक्य नव्हते.

एक चिकट म्हातारा गृहस्थ विमानांच्या सुटया भागाच्या डेपोचा प्रमुख होता. त्याने ऐन युद्धप्रसंगी खुद्द बेलिंजरकडे अधिकृत पावतीची मागणी केली ! तीशिवाय सुटया भागांचा पुरवठा करण्यास त्याने नकार दिला.

त्याचा हा आडमुठेपणा पाहून बेलिंजर संतापाने लाल झाला. त्याच्यासारखा सुस्वभावी मनुष्य सर्व कारकीर्दीत क्वचितच इतका संतापला असेल. त्याने काही

नौसैनिकाच्या हातात नंग्या तलवारी दिल्या. आणि या स्टोअरकीपरवर त्या रोखून इतर सैनिकांना हवे ते सुटे भाग घेऊन जाण्यास सांगितले !

असे एखादे उदाहरण सोडले तर बहुतेकांनी अधिकाऱ्यांना मनःपूर्वक सहकार्य दिले. त्यांनी अपार धैर्याने संकटाला तोंड दिले. हिकॅम तळावरील एका अट्टल दारुड्याची हकीकत मोलिसनच्या हृदयात घर करून राहिली. शारीरिक दृष्ट्या दुर्बल झाल्यामुळे या दारुड्याकडे बागेची जोपासना करण्याचे काम देण्यात आले होते. पूर्वीच्या युद्धात त्याने शौर्याबद्दल बरीच पदके मिळविली होती. आज त्याच्यातला झुंजार सैनिक पुन्हा जागा झाला ! त्याने कोठून तरी एक मशिनगन पैदा केली आणि जपानी विमानांवर तुफान गोळीबार केला. या विजोड द्वंद्वात तो मारला गेला. परंतु त्याचे शौर्य हिकॅम तळावरील सर्वांच्याच अभिमानाचा विषय बनले !

हिकॅम तळावरील बाँबर पथकाचा नेता कॅप्टन ॲलन याला हल्ल्यापूर्वी काही मिनिटे अमेरिकेहून फोन आला होता. त्याची सहा महिन्याची गर्भवती पत्नी फ्लोरिडामध्ये तिच्या आईवडिलांकडे रहात होती. तिचा हा फोन होता. प्रशांत महासागरातील तंग परिस्थितीमुळे तिला ॲलनची काळजी वाटत होती. हवाईमध्ये परत येण्याची इच्छा तिने फोनवर व्यक्त केली. ॲलनने तिची समजूत घातली व परिस्थिती निवळेपर्यंत होनोलुलूला न परतण्याची सूचना दिली. योग्य वेळी तिच्या हवाईच्या प्रवासासाठी व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले व फोन खाली ठेवला.

त्यानंतर काही मिनिटातच पाठोपाठ होणाऱ्या बाँबस्फोटांनी जमीन हादरली ! ॲलनला जपानी हल्ल्याची जाणीव ताबडतोब झाली. तत्क्षणी त्याला एकच गोष्ट सुचली ! आपली बी–१७ विमाने उडवून जपान्यांशी मुकाबला करायचा ! तो त्वरेने विमानांकडे धावला. तिथे जपानी विमानांनी हैदोस घातला होता. विमाने दुरुस्त करण्यासाठी वापरायची हत्यारे बाँबस्फोटात उद्ध्वस्त झाली होती. ॲलनच्या डोळ्यादेखत एक बाँब सुटे भाग ठेवलेल्या इमारतीत फुटला आणि नटबोल्टसह अनेक प्रकारच्या वस्तू हवेत उधळल्या गेल्या ! येथेही व्हीलरप्रमाणे बरेच सैनिक ठार झाले. एक बाँब ३००० सैनिकांच्या बराकीतील भोजनगृहात घुसला आणि न्याहारी घेणाऱ्या सैनिकात फुटला ! वेदनांनी कण्हणारे, ओरडणारे, खवळलेले सैनिक जखमींना आपल्याबरोबर ओढत बाहेर पडू लागले.

ते जोरजोराने आक्रोश करीत होते, 'अरे देवा, हे काय चाललय् ?' वस्तुस्थितीची जाणीव होण्याअगोदरच आणखी एका बाँबने त्यापैकी कित्येकांचा बळी घतला !

काही बाँब पाण्याच्या मोठमोठ्या नळात घुसून फुटले. नळाची नासधूस होऊन १५–२० फूट उंचीचा गरम पाण्याचा फवारा उडू लागला. तळावरील अग्निशामक सामुग्री नष्ट झाली. कॅप्टन ॲलन विमानतळाजवळ पोचला तेव्हा गोळ्यांच्या वरसातीमुळे बाँबर विमाने एका पाठोपाठ पेट घेऊ लागली होती.

ॲलनने या गोंधळातही एका बी–१७ विमानाच्या कॉकपिटमध्ये उडी टाकली

व ते उडविण्याचा प्रयत्न केला. त्याने त्याचे इंजिने सुरू केली पण चवथे सुरू होईना. विमान जळत्या विमानगृहापासून दूर सुरक्षित जागेवर नेण्यात त्याला यश आले. तेवढ्यात जपान्यांची 'झीरो' फायटर्स बॉंबर्सच्या दिमतीस आली. त्याच्या चढाईमुळे अॅलनला त्याचा प्रयत्न अर्धवट सोडावा लागला. दरम्यान बिजलीप्रमाणे लखलखणारे अलौकिक शौर्य त्याच्या डोळ्यासमोर चमकून गेले! एक शूर वैमानिक एका बी-१८ विमानावर चढून हातातील मशिनगनने जपानी विमानांना पिटाळून लावीत होता. तो उभा असलेल्या विमानाने थोड्याच कालात पेट घेतला. या वीराचे नाव, तसेच तो जगला, की धारातीर्थी पडला ते अॅलनला नंतर कळू शकले नाही. ◻

## बचावाची अखेरची संधी !

पर्ल बंदरावर जपानचा विमान हल्ला झाला त्याच दिवशी बी-१७ जातीची १२ विमाने अमेरिकेहून फिलिपाईन्सकडे चालली होती. ही विमाने पेट्रोल भरण्यासाठी व इतर तपासणीसाठी हिकॅम विमानतळावर थांबणार होती. आपल्यापुढे कोणते ताट वाढून ठेवले आहे याची वैमानिकांना कल्पना नव्हती !

त्यांच्या ठरलेल्या आगमनामुळे अगोदरच फार मोठा घोटाळा झाला होता. या विमानांमुळेच आरमाराचे रक्षण करण्याची अमेरिकनांच्या हातची शेवटची संधी हुकली! ओहूच्या उत्तर भागातील कहुका टेकडीवर एका नव्या रडार स्टेशनच्या उभारणीचे काम सुरू होते. हवाईतील आरमाराला विमानहल्ल्याची पूर्वसूचना मिळावी यासाठी या स्टेशनची योजना होती. जपानी हल्ल्यांच्या दिवशी रडार यंत्र उभारून पूर्ण झालेले होते. जोसेफ व जॉर्ज हे दोघे हे दोघे रडार ऑपरेटर सकाळी रडारची चाचणी घेत होते. एकाएकी त्यांना रडारच्या पडद्यावर असंख्य विमाने दिसली! रविवारी सकाळी हवाईच्या आसपास इतक्या प्रचंड संख्येने विमाने उडत असणे शक्य नव्हते. त्यामुळे रडार यंत्रातच काही तरी बिघाड झाला असावा असा संशय त्यांना आला. परंतु यंत्राची काळजीपूर्वक तपासणी करता तो खोटा ठरला. रडार व्यवस्थित काम देत होते.

त्यांनी विमानांच्या या प्रचंड ताफ्याची जागा निश्चित ठरविली. रडार स्टेशनपासून १३६ मैल अंतरावर असलेला हा ताफा पर्ल बंदराच्या रोखाने येत असल्याचे त्यांना आढळले. तो जेव्हा १३२ मैलावर आला तेव्हा त्यांनी ही बातमी बेटावरील माहिती केंद्राच्या अधिकाऱ्याला कळविली.

या केंद्रावरील अधिकारी लेफ्टनंट टेलर याने या बातमीकडे दुर्लक्ष केले. अमेरिकेहून फिलिपाईन्सकडे जाताना हवाईत उतरण्यासाठी येत असलेली १२ विमाने रडारने टिपली असावीत असे त्याला वाटले.

यावेळी फक्त ७-१५ झाले होते. फुशिडाचे बलिष्ठ विमानदल पर्ल हर्बरवर पोचण्यास अजून ४५ मिनिटे लागणार होती. अमेरिकन सैनिकांना प्रतिकारासाठी सज्ज करण्यास हा अवधी पुरेसा होता. तेवढ्यात अमेरिकन वैमानिकांना आकाशात झेप घेऊन शत्रूशी झुंजण्यासाठी सामोरे जाता येणे शक्य होते. युद्धनौकावरील खलाशांना मुराटाच्या बोजड टारपेडोफेक्या विमानांचा खातमा करण्यासाठी तोफा सज्ज करण्यासही हा अवधी पुरेसा होता! हवाईमधील आरमाराचा जपानी हल्ल्यापासून बचाव करण्यासाठीं ही शेवटची संधी होती. पण तिने अमेरिकनांना हुलकावणी दिली!

एवढ्या मोठ्या अनर्थाला कारणीभूत झालेली अमेरिकन विमाने स्वतः तरी कुठे सुरक्षित राहिली? तीही लढाईच्या धुमश्चक्रीत सापडली!

मेजर लंडनच्या नेतृत्वाखाली अमेरिका ते हवाई या त्यांच्या प्रदीर्घ प्रवासाचा शेवट जवळ आला होता. गेले चौदा तास सतत उडत असल्याने ती विस्कळीत होऊन एकेकटीच प्रवास करीत होती. कित्येकांचे पेट्रोल संपत आले होते. सर्वच विमाने निःशस्त्र होती. त्यांच्या तोफात भुसा ठासला होता.

ओहूला पोचण्यापूर्वी त्यांनी एक दाट ढग ओलांडला. तोच ६ तें ९ विमाने दक्षिणेकडून त्यांच्या रोखाने येत असलेली त्यांना आढळली. हवाईतील अमेरिकन विमानदलाची विमाने स्वागतासाठी आपल्याला सामोरी येत आहेत असे लंडनला वाटले. परतु या नवख्या विमानांनी मशिनगनचा मारा करीत थेट त्यांच्यावरच चाल केली! हल्लेखोर विमाने अगदी नजीक आल्यावर त्यांवरील उगवत्या सूर्याची चिन्हे पाहून त्यांना ती जपानी असल्याचा साक्षात्कार झाला!

लडनने तत्क्षणी बचावात्मक पवित्रा घेतला. त्याने एका ढगात घुसून जपानी विमानांना झुकांडी दिली. थोड्याच वेळात तो ओहूवर येऊन पोचला. हिकॅम विमानतळावरील दृष्य त्याला उकळत्या कढईसारखे भासले. नियंत्रक मनोऱ्याला आगमनाची सूचना देऊन ६००० फुटावरून खाली उतरण्यासाठी घिरट्या घालण्यास सुरुवात केली.

तीन जपानी विमाने अगदी जवळून त्याचा पाठलाग करीत असल्याचे नियंत्रक मनोऱ्याने त्याला सांगितले. त्याने मागे वळून पाहिले. खरोखरीच तीन जपानी विमाने घोरपडीने खडकाला चिकटावे तशी त्याची शेपटी धरून येत होती. भरीस भर म्हणून खालील अमेरिकन सैनिक त्याला शत्रू समजून त्याच्यावर तोफा व मशिनगन्स डागीत होते. तरीसुद्धा लंडन न डगमगता खाली उतरत राहिला.

इतक्या भीषण रणकंदनातही हिकॅम विमानतळावर उतरण्यात बी-१७ च्या अमेरिकन वैमानिकांनी अलौकिक कौशल्य दाखविले! एकजण आग्नेयेकडील बेलोज येथे उतरला तर दोघेजण हलेवा येथील आखूड उड्डाणपट्टीवर उतरले. बाकी सर्वजण लंडनप्रमाणेच हिकॅम विमानतळावरच उतरले!

## जानेवारीही संपत आला आहे

आत्ताच तुमच्या रेडिओ व टेलिव्हिजन परवान्याचे नूतनीकरण करा.

टपाल कचेरीतील नंतरच्या लांबच लांब रांगा टाळा.

जानेवारी अखेरपर्यंत थांबू नका कारण त्यानंतर तुम्हांला दंड भरावा लागेल.

तीन किंवा पांच वर्षांसाठी रेडिओ परवान्याचे नूतनीकरण करून सूट मिळवा. तुम्ही आपले बिऱ्हाड दुसऱ्या गावी हलविल्यास तुमचा परवाना त्या गावी बदलून घेण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी नजीकच्या मुख्य किंवा उप टपाल कचेरीत तो दाखल करा.

## भारतीय टपाल व तार खाते

DAVP 70/572

## शिकारीची मोजदाद

आकाशातील दृश्य हळूहळू बदलले. जपानी बॉंबर्स व फायटर्सची घरघर आता संपली. काही रेंगाळणाऱ्या विमानाशिवाय बाकीची सर्व दूर निघून गेली.

विमानवाहकांकडे परतताना त्यांनी पूर्वीप्रमाणे आखीव पथके बनविली नाहीत. प्रत्येक विमान त्याची कामगिरी संपल्यावर ओहूच्या वायव्येस २० मैलावरील संकेतस्थानी गेले. तिथे बॉंबर विमाने फायटर्सची वाट पहात घिरट्या घालीत थांबत. नंतर ती फायटर्ससह आरमाराकडे जायला निघत. फायटर विमानात बॉंबर प्रमाणे दिशादर्शक नसत. त्यांचे रेडिओ सेटही प्रभावी नसत. समुद्रात एकेकटा प्रवास करताना ती भरकटणे शक्य होते. म्हणून नेहमी ती बॉंबससोबतच प्रवास करीत.

अमेरिकन विमानांना परतणाऱ्या जपानी विमानांचा पाठलाग करून जपानी आरमाराचे स्थान शोधून काढता आले असते. म्हणून जपान्यांनी त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.

फुशिडाचे पथक ओहूहून निघून प्रथम थेट पश्चिमेस ३० मैलपर्यंत गेले आणि नंतर उत्तरेकडे वळले. लेफ्टनंट सदाओला सर्व पथकाचीच वाट चुकते की काय अशी भीती वाटू लागली!

टारपेडो प्रक्षेपक विमानांचे पथक प्रथम दक्षिणेस (आरमाराच्या विरुद्ध दिशेस) गेले व नंतर पूर्वेकडे वळून पुन्हा उत्तरेकडे गेले.

टारपेडोफेक्या विमानांनी सर्वात प्रथम युद्धभूमी सोडली. एकदा जहाजांवर टारपेडोफेक केल्यानंतर त्यांचे कामच संपले होते. लढाऊ विमानांच्या संरक्षणात त्यांनी वायव्येकडील संकेतस्थानाकडे प्रयाण केले.

हल्ल्याच्या प्रसंगी वारा पूर्वेकडून पश्चिमेकडे वहात होता. त्यामुळे बॉंबस्फोटांचा व विमानविरोधी तोफांचा धूर फोर्ड बेटावरून अगदी कमी उंचीवरून उडणाऱ्या टारपेडोफेक्या विमानांपासून दूर चालला होता. त्यांच्या वैमानिकांना त्यांची लक्ष्ये स्पष्ट दिसू शकली. वारा पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात असता तर मात्र विमाने व जहाजे यांच्यामध्ये धुराचा काळा पडदा तयार झाला असता. विमानांचे काम अवघड बनले असते. उत्तरेकडील आरमाराकडे परतण्यापूर्वी जपानी वैमानिकांनी अमेरिकन जहाजांचा चांगलाच विध्वंस केला. त्यांच्या कामगिरीचा परिणाम त्यांना एकाच दृष्टिक्षेपात दिसून येत होता.

सूरमाऱ्या बॉंबर विमानांनी त्यांचे काम चोख केले. आरमाराला लेफ्टनंट कमांडर ताकाहाशी याचा रेडिओ संदेश मिळाला, 'आम्ही फोर्ड बेट, हिकॅम व व्हीलर विमानतळावर बॉंबफेक केली व शत्रूचे भयंकर नुकसान केले.'

ताकाहाशीच्या पथकातील फक्त एकच विमान पाडले गेले. शिवाय अमेरिकनांनी तीन लढाऊ विमानेही पाडली. परंतु या विमानांनी नष्ट होण्यापूर्वी शत्रूच्या हवाई सामर्थ्याचे भरपूर नुकसान केले. बेलोज विमानतळावरील बऱ्याच अमेरिकन विमा-

नांनी उड्डाण करण्याचा प्रयत्न केला. परंतु जपानी फायटर्सनी एकापाठोपाठ सर्व विमाने उड्डाणापूर्वीच खाली पाडली.

फुशिडाच्या नेतृत्वाखालील उंचावरून बाँबफेक करणाऱ्या विमानांनी त्यांची कामगिरी अचूक पार पाडली. त्यांनी शत्रूच्या प्रत्येक विमानासाठी फक्त एकेकच बाँब खर्च केला. प्रत्येक बाँबचा विमान नष्ट होण्यासाठी हुकमी उपयोग झाला.

फुशिडाने त्याच्या सहकाऱ्यांना बजावून ठेवले होते, 'जरूर भासल्यास लक्ष्यावरून दोनदा, तीनदा अगर चार वेळा फेरी मारा. पण नेमबाजीबद्दल आत्मविश्वास वाटल्याशिवाय बाँब सोडू नका. एकही बाँब व्यर्थ जाता कामा नये.' त्याच्या सहकाऱ्यांनी त्याची शिकवण मन:पूर्वक पाळली. स्वत: फुशिडानेही कॅलिफोर्निया जहाजावर बाँब टाकण्यापूर्वी त्यावरून तीन घिरट्या घातल्या.

शत्रूच्या नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी फुशिडा मागे रेंगाळला. तो पर्ल हार्बरवर बराच वेळ हिंडत राहिला. त्याचे काम सोपे नव्हते ! जहाजांवरून व किनाऱ्यावरील गोदीच्या आवारातून विमानविरोधी तोफा त्याचा बळी घेण्यासाठी जोरदार मारा करीत होत्या. आकाशात जमलेल्या दाट धुरामुळे जमिनीवरील दृश्य स्पष्ट दिसत नव्हते. तरीही फुशिडाने त्याचे काम धाडसाने व चिकाटीने पुरे केले.

टारपेडो व बाँबहल्ल्यामुळे बंदराला अगदी अवकळा आली होती. तेलाचा दाट तवंग पाण्यावर जमून ठिकठिकाणी पेटला होता. जहाजावरील व पाण्यातील सैनिक आगीच्या ज्वाळा व धूर यामुळे गुदमरत होते. जळत्या जहाजांवरून समुद्रात उड्या टाकून किनारा गाठण्यासाठी त्यांची जिवाच्या आकांताने धडपड चालली होती. अमेरिकन युद्धनौकांची अगदी दशा झाली होती. कित्येक पाण्यात बुडत होत्या, काहींना आगीने घेरले होते, तर काहींचा भयंकर विध्वंस झाला होता.

हल्ल्याची दुसरी फेरी सुरू करण्यासाठी येणारी नवी विमाने ८-३० नतर ओहूच्या पूर्वेस जमू लागली. ८-५५ ला त्यांना दिलेला हल्ल्याचा इशारा फुशिडाने ऐकला. ही विमाने फोर्ड बेटावर पोचल्याचेही त्याने पाहिले. आरमाराकडे परतण्यापूर्वी त्यांना शत्रूसंबंधी काही विशेष माहिती देण्याचा त्याचा विचार होता. परंतु त्यांनी जाणतेपणाने कामगिरीला प्रारंभ केलेला पाहून त्याने तो रद्द केला.

फुशिडा संतुष्ट होऊन 'अकागी' वर पोचला. त्याक्षणी त्याला आजच्या कामगिरीचे मोल कळणे शक्य नव्हते. आज त्याने अमेरिकनांवर केलेल्या वज्राघाताचे ठळक पडसाद जगाच्या व जपानच्या इतिहासात उमटणार होते. एका सामर्थ्यवान पण निद्रिस्त मुचकुंदाची झोप त्याने उडविली होती. झोपेतून जागा झालेला मुचकुंद त्याच्या जळजळीत सामर्थ्यवान नजरेने जपानी राष्ट्राची राखरांगोळी करण्यास सिद्ध झाला होता. फुशिडाला त्याच्या मायभूमीच्या भयाण भवितव्याची कल्पना नव्हती. तो स्वत:च्या विजयानंदात मग्न होता. (क्रमश:)

(आधारीत)

# निवडणूक आघाडीवर आयाराम-गयारामना संधी

**बा. दा. रानडे**

लोकसभा उमेदवारांची निवड इंदिरा गांधींची कॉंग्रेस ज्या पद्धतीने करीत आहे ती पाहता संधिसाधू आयाराम-गयारामांचे राजकारण निवडणुकीनंतरही संपेल असे दिसत नाही, आणि नव्या लोकसभेत कोणत्याच पक्षास हुकमी बहुमत मिळण्याची शक्यता दिसत नसल्याने आयाराम-गयारामांचे चांगले फावणार आहे. संधिसाधू पक्षांतराला आळा घातला पाहिजे, राजकीय पक्षांनी त्याबाबतीत आपसात काही संकेत ठरविले पाहिजेत, अशी भाषा राजकीय पक्षांचे नेते बोलतात पण त्यांची कृती मात्र नेमकी त्या उलट असते. याबाबतीत सर्वात मोठा पक्ष या नात्याने काही चांगल्या प्रथा पाडण्याची जबाबदारी इंदिरा-कॉंग्रेसची आहे, पण तो पक्षही स्वतःच पूर्वी ठरविलेली तत्त्वे उमेदवार निवडताना राजरोस पायदळी तुडवीत आहे. म्हैसूर प्रजासमाजवादी पक्षाच्या कही सभासदांनी नुकताच कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला त्यांपैकी विसर्जित लोकसभेचे सभासद असलेल्या दोघांना इंदिरा-कॉंग्रेसच्या केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाने लोकसभेचे तिकिट दिले आहे. या फुटीरांना तिकिटे देऊ नका, ते ज्या मतदारसंघातून पूर्वी निवडून आले तेथे कॉंग्रेसचे उमेदवार उभे करू नयेत, आमच्यासाठी त्या जागा ठेवाव्यात अशी निवडणूक समझोत्याबाबत राज्यपातळीवर झालेल्या वाटाघाटीत प्रजासमाजवादी नेत्यांची मागणी होती. पण ती इंदिरा-कॉंग्रेसच्या नेत्यांनी मान्य केली नाही.

म्हैसूर हे निजलिंगप्पा-कॉंग्रेसचे सरकार असलेले राज्य. काहीही करून तेथे आपले वजन वाढवायचे, अधिक जागा मिळवायच्या, असे इंदिरा-कॉंग्रेसचे धोरण आहे. प्रजासमाजवादी पक्षाच्या एका गटाला फोडण्यात इंदिरा-कॉंग्रेसच्या नेत्यांनी यश मिळविले. तिकिटांचे, अधिकारपदांचे आश्वासन देऊनच ही फाटाफूट करण्यात आली. फुटीरांना जवळ करण्यात आपले काही चुकते आहे याची खंत इंदिरा-

काँग्रेसच्या एकाही नेत्याला वाटली नाही. त्याबद्दल नापसंतीचा शब्दसुद्धा कोणी काढला नाही. या संधिसाधू फुटीरांच्या मदतीने इंदिरा-काँग्रेस थोड्या अधिक जागा मिळवील. कदाचित बहुमतही मिळवील. पण ते स्थिर, विश्वसनीय बहुमत नव्हे. हे संधिसाधू केव्हा उलटतील याचा नेम नाही. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर अनेक राज्यांत हा अनुभव आलेला असता त्यापासून काही धडा घेण्यास इंदिरा-काँग्रेसचे नेते तयार नाहीत. त्यांना फक्त उद्याची सत्ता दिसते. परवाची अस्थिरता दिसत नाही. अशाच पद्धतीने आमचे राजकीय पक्ष वागणार असतील तर या देशात स्थिर, भक्कम पायावर लोकशाही उभी राहणार आहे की नाही याचीच चिंता वाटू लागते.

इंदिरा-काँग्रेसला विरोध करण्यासाठी, तसेच सिंडिकेट-काँग्रेसच्या नेतृत्वाखालील प्रतिगामी आघाडीला विरोध करण्यासाठी, देशात तिसरी लोकशाही आघाडी आपण उभारणार आहोत असे केरळ मधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते नंबुद्रिपाद यांनी नुकतेच सांगितले. पण त्यांच्या या आघाडीत कोण येणार? केरळ व पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या काही छोट्या डाव्या पक्षापलीकडे त्यांना आणखी कोणाचा पाठिंबा मिळण्याची शक्यता नाही. कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी यांचे इंदिरा सरकार व इंदिरा-काँग्रेसबद्दलचे सध्याचे धोरण लक्षात घेता, त्यांच्याशी त्यांचे जमणार नाही. संयुक्त समाजवादी पक्षाची भूमिका इंदिरा हटावची आहे पण तो पक्ष अखिल भारतीय पातळीवर इंडिकेटच्या नेतृत्वाखालील आघाडीत सामील झाला आहे. संयुक्त समाजवादी पक्षाच्या या धोरणामुळे त्याच्याशी केरळमध्ये निवडणूक समझोता करावयाचा नाही असे मार्क्सवादी पक्षाने ठरविले आहे. डाव्यांचे हे मोठे पक्ष नंबुद्रिपाद यांच्या नियोजित आघाडीबाहेर राहणार असल्याने ही आघाडी प्रभावी होणार नाही.

पूर्वीच्या कोणत्याही निवडणुकीत डावे गट सध्याएवढे विस्कळीत नव्हते. त्यामुळे नव्या लोकसभेत डाव्यांचे वजन आणखी घटेल. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीत संयुक्त समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट व उजवे कम्युनिस्ट या चार अखिल भारतीय पक्षांनी ७८ जागा व १७·३८ टक्के मते मिळविली होती. जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष या उजव्या गटाच्या पक्षांना ७९ जागा व १८·०९ टक्के मते मिळाली. पुरोगामी गट, शे. का. पक्ष, रेव्होल्युशनरी सोशॅलिस्ट पार्टी या छोट्या डाव्या पक्षांना मिळालेल्या जागा जमेस धरल्या तर डाव्यांना उजव्या गटापेक्षा थोड्या जास्त जागा १९६७ मध्ये मिळाल्या पण मते मात्र उजव्या पक्षांनी डाव्यांपेक्षा जास्त मिळविली.

लोकसभेच्या गेल्या चार निवडणुकात जागा व मते दोन्ही दृष्टींनी उजव्या गटांचे बळ कसे वाढत गेले आहे याची कल्पना पुढील आकड्यांवरून येईल.

### उजवे गट


| वर्ष | जागा | शेकडा मते |
|---|---|---|
| १९५२ | ३ | ३·१० |
| १९५७ | ४ | ५.९३ |
| १९६२ | ३२ | १५·५८ |
| १९६७ | ७९ | १८·०९ |

येथे उजव्या गटात जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांचा समावेश केला आहे. यापैकी पहिल्या दोन निवडणुकातील आकडे फक्त जनसंघाचे आहेत कारण त्यावेळी स्वतंत्र पक्ष अस्तित्वातच नव्हता.

उजव्या गटातील पक्षांमध्ये स्वतंत्र पक्षाचे बळ १९६२ व १९६७ या दोन निवडणुकात १८ वरून ४४ पर्यंत वाढले. एवढेच नव्हे तर कम्युनिस्ट पक्षास बाजूला सारून विरोधी पक्षात पहिल्या क्रमांकाचे स्थान त्या पक्षाने मिळविले. पक्षाला मिळालेल्या मताच्या प्रमाणातही वाढ होऊन १९६२ मध्ये ७·८९ टक्के व १९६७ मध्ये ८·५९ टक्के मते मिळाली. जागांच्या दृष्टीने विरोधी पक्षात स्वतंत्र पक्षाने १९६७ मध्ये पहिला क्रमांक मिळविला पण मतांच्या दृष्टीने ९·३२ टक्के मते मिळवून जनसंघाने पहिला क्रमांक मिळविला.

कॉंग्रेस पक्ष दुभंगल्यावर सिंडिकेट कॉंग्रेसने जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांच्याबरोबर आघाडी केल्याने उजव्या गटांचे बळ आणखी वाढले आहे व डाव्या गटांमधील विस्कळितपणाचा फायदा घेऊन उजवे गट नव्या लोकसभेत पूर्वीपेक्षा बऱ्याच जास्त जागा मिळविण्याची शक्यता आहे. विसर्जित लोकसभेत सिंडिकेट कॉंग्रेसचे ६५ सभासद होते हे लक्षात घेता उजव्या गटामध्ये आज तरी तो सर्वात मोठा पक्ष दिसत असला तरी पोटनिवडणुकांचे निकाल लक्षात घेता हा पक्ष आपले पाय रोवू शकलेला नाही असेच दिसून येते. उजव्यांच्या आघाडीत सध्या त्याला पहिले स्थान असले तरी निवडणुकीनंतर ते राहीलच असे नाही. स्वतंत्र पक्षाने गेल्या निवडणुकीत जागांच्या दृष्टीने पहिला क्रमांक मिळविला पण ओरिसातील गडगडलेले सरकार व गुजरातमधील फूट लक्षात घेता यावेळी त्या पक्षाला पहिले स्थान मिळण्याचा संभव बराच कमी आहे. जनसंघाचा वाढता प्रभाव लक्षात घेता जनसंघ ते स्थान मिळविण्याची बरीच शक्यता आहे. याचा अर्थ आघाडीचा फायदा सर्वात जास्त कोणाला मिळणार असेल तर तो जनसंघास.

संयुक्त समाजवादीपक्ष उजव्यांच्या आघाडीत सामील झाल्याने त्या पक्षाला बिहार व उत्तर प्रदेशात थोडया जास्त जागा मिळतील पण केरळ व पश्चिम बंगालमध्ये त्या पक्षाचे वजन घटेल. कारण या दोन राज्यात व इतरत्रही दोन्ही कम्युनिस्ट या पक्षाशी कोणताही निवडणूक समझोता करण्यास तयार नाहीत.


मिळवा!
5%
कर-मुक्त
व्याज
सप्तवर्षीय राष्ट्रीय बचतपत्रें
तुमची प्राप्ती
रु. 20000
रु. 30000
रु. 40000
रु. 50000
6.37
7.99
9.39
14.71
राष्ट्रीय बचत संघटना

पश्चिम बंगालमध्ये तर संयुक्त समाजवादी पक्षाच्या धोरणामुळे उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आठ पक्षांची आघाडीही मोडण्याचा धोका निर्माण झाला आहे. आघाडीने संयुक्त कार्यक्रमाच्या पायावर निवडणुका लढवल्या अशी बहुसंख्य घटक पक्षांची भूमिका आहे. पण संयुक्त समाजवाद्यांचा संयुक्त कार्यक्रम आताच तयार करण्यास विरोध आहे. त्यांना नुसतीच आघाडी हवी आहे. उजवे व डावे असे मिश्र धोरण व कार्यक्रम असलेले पक्ष एकत्र आले तर त्यांच्यात कार्यक्रमाबाबत एकवाक्यता होणे कठीण म्हणून अशा संमिश्र आघाडीत संयुक्त कार्यक्रमाचा आग्रह एवढ्यातच नको अशी भूमिका संयुक्त समाजवाद्यांनी घेतली तर ती समजण्यासारखी आहे. पण पश्चिम बंगालमधील आठ पक्षांच्या आघाडीचे स्वरूप तसे नाही. त्यात सर्व डावे पक्षच आहेत. संयुक्त कार्यक्रम तयार करणे त्यांना अवघड नाही. तेव्हा संयुक्त कार्यक्रमाच्या पायावर आघाडी उभी राहू शकत असेल तर संयुक्त समाजवाद्यांनी त्यात मोडता घालणे बरोबर नाही. आघाडी फुटण्याइतके हे मतभेद ताणले जाणार नाहीत अशी आशा आहे. तसे घडल्यास डाव्यांची शक्ती आणखी दुभंगून डाव्या चळवळीचीच हानी होणार आहे.

निवडणुकीत कम्युनिस्ट व मुस्लिम लीग यांच्याशी आमचा पक्ष समझोता करणार नाही असे पंतप्रधान इंदिरा गांधींनी पुन्हा जाहीर केले. प्रजासमाजवादी व इंदिरा-काँग्रेसच्या नेत्यात निवडणूक समझोत्याच्या वाटाघाटी फिसकटल्या. महाराष्ट्रात शे. का. पक्षाशीही समझोता झाला नाही. रिपब्लिकन पक्षातील गायकवाड गटाशी इंदिरा–काँग्रेसने समझोता केला पण खोब्रागडे गटाशी वाटाघाटी फिसकटल्या. आपला पक्ष कम्युनिस्ट व डाव्यांचे मदतीशिवाय हुकमी बहुमत मिळवील अशी आशा इंदिरा–काँग्रेसचे नेत्यांना वाटत आहे. पण ते सोपे नाही.

कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी पक्षांच्या नेत्यांची निवडणूक समझोत्याची बोलणी काही ठिकाणी सुरू केली आहेत पण केवळ हे दोन पक्ष एकत्र येण्याने परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही. पूर्वीच्या जागा टिकविण्यात तरी त्यांना कितपत यश येते याची शंका आहे.

□

'युप्रस'चा अभिनव उपक्रम

# सागरी सहल

आनंद फुले

एक अनोखा क्षण.

समोर दिसणारे भाभा अॅटॉमिक एनर्जी संस्थेच्या परिसराची ओळख पटविणारे लाल दिवे. त्याच्या उजव्या बाजूला दिव्यांनी उजळून निघालेली पूर्व किनाऱ्यावरची मुंबई. डाव्या बाजूला ठाण्याची खाडी. त्याच्या बाजूला बेलापूरच्या परिसराची रात्रीची होणारी दीपमय जाणीव.

बरोबर बारा वाजले. १९७० संपले. १९७१ सुरू झाले. दूरवरच्या मुंबईला कदाचित गेट वे ऑफ इंडियाला–डागलेल्या तोफांचा आवाज कानी आला. त्या वेळी गेट वे ऑफ इडियाला केवढा जल्लोष चालू असेल. दरवर्षी तिथं केवढा जल्लोष असतो.

अशा वेळी मुंबईच्या पूर्वेला अगदी ट्रॉम्बेसमोर घारापुरी बेटाच्या जवळ उभ्या असलेल्या एका शिडाच्या पडावात बरोबर ४४ जण हा अनोखा क्षण अनुभवत होते. समुद्राचं पाणी शांत होतं. अजिबात वारा नव्हता म्हणून नावाड्याचा नाईलाज झाला होता. वारा सुटल्याशिवाय ट्रॉम्बेच्या धक्क्याला पडाव लागणं शक्य नव्हतं. तासाभरानं वारा सुटेल असं संदिग्धपणं सांगत त्या मोहन व माधव नावाड्यांनी झक्कपैकी पथारी पसरून तण्णावून दिली होती.

पडावांतल्या ४४ जणांची मनःस्थिती काहीशी विचित्र झाली होती. दुपारी बरोबर सव्वा चार वाजता रेवसहून परतीचा प्रवास सुरू झाला तेव्हा नावाड्यांनी तीन तासात पोहोचू असं सांगितलं होतं. पडाव मुंबईच्या परिसरात येईस्तो सारं सुरळित होतं. पण वाऱ्यानं चक्क पाठ फिरवली. वारा नाही; पडावाची आगेकूच नाही. नावाड्यांनी आपला अनुभव पणास लावून शिडाची दिशा वाऱ्याच्या कलाकलानं बदलून थोडं बहुत यश मिळविलं, मग वारा सुटेपर्यंत काहीही करता येणं शक्य नाही असं जाहीर करून टाकलं. वारा सुटल्यावर पडाव ठाण्याच्या खाडीकडं भरकटत जाऊ नये म्हणून त्यांनी पडाव घारापुरीच्या बेटाच्या आडोश्याला घेतला. नंतर चक्क तणगावून दिली.

साता ऐवजी दहा वाजेपर्यंत पोहचू असं वाटत होतं. तोवर साऱ्यांनाच भुका जाणवत होत्या. पण जेव्हा नावाड्यांनी वारा सुटेपर्यंत काहीही करता येणं शक्य नाही ह्याची जाणीव करून दिली तेव्हा साऱ्यांनाच भुकेचा खरोखरीच विसर पडला. ट्रॉम्बेच्या धक्क्याला केव्हा पोहचू ह्यानंच साऱ्यांची मनं धास्तावली. कारण सकाळी दहा वाजता 'कोकण सेवक'चं रत्नागिरीला जाणं निश्चित झालं होतं. वारा केव्हा सुटेल हे त्या नावाड्यांना अंदाजानं सुद्धा सांगता येत नव्हतं. बहुधा ते स्वतःच भांबावलेले होते. वेळेचा दिलासा त्यांच्याकडनं मिळाला नाही. म्हणून पडावातले ४४ जण अक्षरशः हवालदिल झाले होते. सागरात पडाव शांतपणं अगदी किनाऱ्याशी बांधल्यागत डुलत होता. बसलेल्या ४४ जणांना समोरचा मुंबई दिसत होती. ठाण्याची खाडी दिसत होती. बेलापूरचा परिसर दिसत होता.

अशा पार्श्वभूमीवर पडावातल्या त्या ४४ जणांसाठी १९७० संपलं. १९७१ सुरू झालं.

'युवक प्रगती सहयोग' ह्या संस्थेच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या 'सागरी सहली'त भाग घेणाऱ्या त्या ४४ जणांसाठी नव्या वर्षाची सुरुवात अनोख्या व अविस्मरणीय अनुभवासह येणेप्रमाणे केवळ योगायोगानं प्रत्यक्ष सागरात झाली होती.

'युप्रस'च्या वतीने २६ डिसेंबर १९७० ते ४ जानेवारी १९७१ अशी दहा दिवसांची 'सागरी सहल' झाली. ही केवळ सहल नव्हती. खरं तर एक शैक्षणिक उपक्रम होता.

समुद्राशी संबंधित विविध अंगोपांगाची जाणीव व्हावी व संरक्षण, अन्न, दळणवळण, संपत्ती, कर्तृत्वासाठी क्षेत्र वगैरे नानाविध दृष्टीकोनातून विद्यार्थी व युवकांना सागराचा परिचय व्हावा म्हणून 'युप्रस'चे संचालक श्री. दिवाकर आगाशे ह्यांनी ह्या 'सागरी सहली'चे मनावर घेतले. स्वतःच्या कल्पनेप्रमाणे सहलीची रूपरेषा निश्चित करण्यात संबंधित सरकारी यंत्रणेची परवानगी मिळविणे अनिवार्य असल्यामुळे जवळजवळ चार महिन्यांचा कालावधी रूपरेषा निश्चित करण्यास लागला. काही बदल करावे लागले. सरकारचा पाठिंबा असल्यामुळेच प्रत्यक्षात झालेली 'सागरी सहल' अनेक दृष्टीनं यशस्वी झाली. श्री. भैय्यासाहेब आगाशे व त्यांचे डॉ. खेर, शरद पाटील, चंद्रकांत शहा, काका लिखिते, कोर्डे, दादा सावंत, कारेकर, अशोक वैद्य वगैरे सहकारी ह्यांच्या पूर्वनियोजित व्यवस्थापनामुळंच सुमारे १३५ लोकांची ही सागरी सहल यशस्वी होऊ शकली. आगाश्यांनी स्वतःच्या सामाजिक कार्याच्या अंगबळावर मुंबई व रत्नागिरी येथे संबंधित सरकारी संस्थातील अधिकारी व इतर मान्यवर प्रतिष्ठितांचे सक्रिय सहकार्य मिळविले व म्हणून परिणामी सहलीच्या पत्रकात खूप गैरसोयी होतील असे लिहिले होते तरी प्रत्यक्षात काहीच अनुभवाला आल्या नाहीत.

२६ ला सकाळी नऊ वाजता मानखुर्दच्या कुमुद विद्या मंदिराच्या प्रांगणात सहलीच्या पहिल्या कार्यक्रमानं ह्या शैक्षणिक उपक्रमाची सुरुवात झाली. आगाश्यांनी आपल्या प्रास्तविक भाषणात सहलीची पार्श्वभूमी व रूपरेषा विस्ताराने सांगितली. नंतर परस्पर परिचयाचा कार्यक्रम झाला.

दुपारी डॉ. अरुण वाघ ह्यांनी समुद्राविषयी नानाविध दृष्टीकोनातून माहिती दिली. नंतर उपमंत्री श्री. देवताळे ह्यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झाले.

रात्री आगाश्यांनी स्वतःचे काही अनुभव व विचार बोलून दाखविले व ग्रुप डिस्कशनची कल्पना मांडली. नंतर काही सागरसंबंधी माहितीपट दाखविण्यात आलेत.

२७ ला सकाळी तारापोरवाला मत्स्यालय पाहण्याचा कार्यक्रम झाला. तेथील अधिकाऱ्यांनी नंतर मत्स्यालयाचं एरवी बघणाऱ्याला कधीही न जाणवणारं व्यवस्थापन दाखविल. अनुषंगानं माहिती दिली.

दुपारी नाविक विभागात जाणे झाले. तिथे आय्. एन्. एस्. विक्रान्त हे लढाऊ जहाज दाखविण्यात आले. प्रत्येक गटाबरोबर असलेल्या अधिकाऱ्यांनी विक्रान्तवर पोचण्यापूर्वी वाटेत दिसलेल्या आरमारी जहाजांची प्राथमिक माहिती दिली. आरमारी जहाजांचे विविध प्रकार सांगितले.

२८ ला सकाळी लाल बहादूर शास्त्री नॉटीकल अँन्ड इंजिनिअरींग कॉलेजला जाण्याचा कार्यक्रम झाला. सुरुवातीला कॉलेजच्या सभागृहात प्राचार्य महोदयांनी व्याख्यान दिले. कॉलेजच्या अभ्यासक्रमाविषयी विवेचन केले. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याची जाणीव दिली. नंतर गटवार कॉलेज दाखविण्यात आले. शेवटी काही माहितीपट दाखवण्यात आले.

दुपारी माझगाव डॉक्सला भेट देण्याचा कार्यक्रम झाला. जहाजांची निर्मिती व दुरुस्ती ह्या संबंधीचे विवेचन देण्यात आले. वेगळेवेगळे विभाग दाखविण्यात आले. तिथे चालणाऱ्या कार्याची माहिती करून देण्यात आली.

२९ ला बॉबे पोर्ट ट्रस्टला भेट देण्याचा कार्यक्रम झाला. श्री. दिलीप नाडकर्णी ह्या मान्यवर अधिकाऱ्यानी मोठ्या उत्साहाने व रस घेऊन साऱ्या गटांना अलेक्झांड्राचा परिसर दाखविला. दुपारी एका गटाला वरिष्ठ अधिकारी श्री. नाडकर्णी यांनी स्वतःच्या चेम्बरमध्ये पोर्ट ट्रस्टच्या कार्याविषयी सखोल माहिती दिली. प्रश्नांची उत्तर दिली. एवढंच नव्हे तर स्वतः ते यंत्रभवनाच्या मनोऱ्यावर आले व तिथून परिसराचा परिचय त्यांना करून दिला. शिवाय श्री. दिलीप नाडकर्णी हेही बरोबर होतेच.

३० ला वर्सोव्याला असलेली सेंट्रल इन्टिटयूट ऑफ फिशरीज एज्युकेशन ही संस्था पहिली. सभागृहात प्राध्यापक वेलणकर ह्यांनी संस्थेविषयी माहिती दिली. नंतर कांही मत्स्य विषयक माहितीपट दाखविण्यात आले. संस्थेचे विविध विभाग पाहण्याचा कार्यक्रम झाला. डॉ. अरुण वाघ ह्यांनी मच्छिमारी संबंधीच्या यांत्रिक उपकरणांची

ओळख करून दिली. फिश प्रोसेसिंगची व तत्संबंधीत यंत्रसामुग्री यांची प्रात्यक्षिका-सह माहिती देण्मात आली. सध्याकाळी वर्सोव्याच्या कोळी वस्तीतून फेरफटका झाला. कार्यक्रमाप्रमाणं तेथल्या लोकांशी गाठीभेटी घेऊन माहिती जाणून घेण्याचा विचार होता. पण वेळेअभावी नुसता फेरफटका झाला.

३१ ला शिडाच्या पडावातनं ट्रॉम्बे ते रेवसची सागर सहल झाली. सर्वांच्याच दृष्टीनं तो ७० चा शेवटचा दिवस विलक्षण अनुभव सौख्यांचा ठरला. त्यात एका पडावातल्या ४४ जणांच्या दृष्टीनं तर विशेषार्थानंच. कारण दुसरा मोठा पड.व उत्साही युवकांनी वल्हवून अकराच्या सुमारासच ट्रॉम्बेच्या धक्क्याला लागला होता. सकाळी नऊला ट्रॉम्बेचा धक्का सोडल्यावर रेवसच्या धक्क्याला लागायला मोठ्या पडावाला दुपारचे दोन व लहान पडावाला सव्वा तीन वाजले. सव्वा चारला रेवसचा धक्का सोडल्यावर मोठ्या पडावानं अकराला ट्रॉम्बेचा धक्का गाठला; तर लहान ४४ जणांच्या पडावाला रात्री एकला वारा सुटल्यावर दोन वाजले.

१ जानेवारीला सकाळी दहाच्या 'कोकण सेवक'ने रत्नागिरीकडे. रत्नागिरीला पोहोचायला सात वाजले.

२ ला सकाळी ४ वाजता प्रत्येकी चारचारच्या गटाने ट्रॉलर्समधून प्रत्यक्ष मच्छि-मारी पाहण्यासाठी निघालो परतायला दुपारचे दोन वाजले. पाण्यात जाळे टाकणे, तासाभरानं ते वर काढणे, मासळीची वर्गवारी करणे वगैरे गोष्टी प्रत्यक्षात पाहा-वयास मिळाल्या.

दुपारी तीन वाजता सागरी जीवनशास्त्रीय संशोधन केंद्र बघण्याचा कार्यक्रम झाला.

नंतर भगवती ( मिऱ्या) बंदराच्या विकासाचे काम दाखविण्यात आले. अधि-काऱ्यांनी योजना समजवून दिली.

संध्याकाळी पटवर्धन हायस्कूलच्या सभागृहात रोटरी क्लबमार्फत सागरी सहलीच्या उपक्रमाचे स्वागत करणारा समारंभ आयोजित करण्यात आला होता. आगाश्यांनी रत्नागिरीकरांना उपक्रमाविषयोची माहिती दिल्यावर सहलीत भाग घेणाऱ्यांच्यावतीनं श्री. सुनील माकोडे, सुभाष कर्णिक, अनिल देवळालीवर, सुधाकर बारगीर, कु. सुषमा सामंत, कु. नलिनी कुळकर्णी वगैरेंनी आपापली प्रति-क्रिया व्यक्त केली. नंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला, श्री. रावसाहेब मगदूम, कुमार आगाशे, शिराळकर वगैरेंच्या रत्नागिरीविषयक विविध प्रश्नांना रत्नागिरी-करांनी मोठ्या आस्थेनं उत्तरं दिली.

३ ला सकाळी आठ वाजता रत्नागिरीच्या सागरी जीवनशास्त्रीय संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. रानडे ह्यांचे जागतिक मत्स्योद्योगासंबंधी विलक्षण माहितीपूर्ण भाषण झाले. भाषणाच्या पूर्वार्धात त्यांनी जागतिक मत्स्योत्पादनाच्या अनुमाना-

बाबत ग्राह्य मानल्या जाणाऱ्या डॉ. एडवर्ड व ग्रॅहम आणि डॉ. डब्ल्यू. चॅपमन ह्या दोन शास्त्रज्ञांच्या दोन विचारप्रणालींचा सऱ्यांनाच कळेल अशा पद्धतीने साध्या-सोप्या भाषेत उहापोह केला. नंतर रत्नागिरीच्या मच्छिमारीच्या विकास योजनेची माहिती दिली. आगामी कार्यक्रमांची रूपरेषा सांगितली.

नंतर दहा वाजता कलेक्टर श्री. गोडबोले ह्यांच्याकडे अल्पोहाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दुपारच्या जेवणापूर्वी गणेश आईस अ‍ॅन्ड कोल्ड स्टोरेज फॅक्टरी, गोरेवाडा (लोकमान्य टिळकांची जन्मभूमी), स्वातंत्र्यवीर सावरकरांशी संबंधित पतित-पावन मंदिर, रत्नाकर कॅनिंग इन्डस्ट्रीज, ही स्थळे पाहण्याचा कार्यक्रम झाला.

दुपारच्या जेवणानंतर सरस्वतीबाई रामचंद्र देसाई अध्यापिका विद्यालयात एक अनौपचारिक आभाराचा कार्यक्रम झाला. 'सागरी सहल'तर्फे आगाश्यांनी कुसुमताई रेगे व त्यांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनी सहकाऱ्यांचे, त्यांनी केलेल्या जेवणाच्या अपेक्षेबाहेरच्या व्यवस्थेबद्दल आभार मानले. पुन: तीच गोष्ट. सहलीच्या पत्रकात आगाश्यांनी जेवण फारसे चांगले असणार नाही अशी स्पष्ट जाणीव दिली होती. पण कसचे काय? मुंबईला व रत्नागिरीला जेवणाच्या बाबतीत शब्दाला जागा नव्हती. रत्नागिरीला करण्यात आलेल्या जेवणाचा विशेष उल्लेख व्हायला हवा तो एवढ्याचसाठी की, मुंबईला कुमुद विद्यामंदिरात जेवणाची व्यवस्था बघण्यासाठी 'युप्रस'ची स्वतःची अशी यंत्रणा होती. पण रत्नागिरीकरांनी अक्षरशः मात केली. 'वरपक्षाची पंगत' ह्या शब्दात कु. नलिनी कुलकर्णी ह्यांनी यथार्थ वर्णन समेत केले होते. त्यात अजिबात अतिशयोक्ती नाही.

दुपारी नंतर गणपती पुळे व मालगुंडला केशवसुत स्मारकाला केशवसुत स्मारकाला जाऊन, जयगडहून मुंबईला परतलो.

४ ला दिवसभर दोन बैठकीत 'सागरी सहली'च्या मूल्यमापनाचा कार्यक्रम झाला. सूचनांचा विचार झाला. ह्यासाठी नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स एज्युकेशनचे संचालक डॉ. देशपांडे हे मुद्दाम दिल्लीहून आले होते.

आठ दिवसातल्या अवांतर वेळात साम्यवाद व भारत, विद्यार्थ्यांच्या समस्या, विधायक दृष्टीकोनातून तरुणांचे कार्यक्षेत्र, युवकांमधील नैराश्य, जुगार-दारू-वेश्याव्यवसायादी समाज विघातक गोष्टी व युवक अशा विषयांवर चर्चा झाली.

नववा वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून तर आय. आय. टी. मध्ये अध्यापक असणाऱ्या पन्नाशीच्या गृहस्थापर्यंत विविध शैक्षणिक स्तरांवरील व वयातील सुमारे १३५ व्यक्तींचा मेळावा ह्या 'सागरी सहली'च्या निमित्ताने एकत्र आला होता. सुमारे साठ शालेय विद्यार्थी होते. शिक्षक होते. केमिस्ट, इंजिनियर, रिसर्च असिस्टंट, वगैरेपासून कारकुनापर्यंत विविध स्तरांवर काम करणारे होते. उमरेड, बुलढाणा, नांदगाव, जळगाव, अकोला, धुळे, नासिक, यवतमाळ वगैरे अनेक


ठिकाणाहून तर आलेच होते पण शिवाय महाराष्ट्राबाहेरच्या अहमदाबाद, हैद्राबाद व इंदोरहून सुद्धा काही आले होते. साहजिकच अवांतर वेळात छोटे छोटे गट होत असत. साऱ्यांशीच ओळख होणंही शक्य नव्हतं. तरीसुद्धा एकंदरीत वातावरण खेळीमेळीचे होते.

प्रसंगोपात्त छोटया बैठकीत कु. सरस्वती शेणई, कु. अलका पंडित, कु. मीरा कुलकर्णी, कु. शैलजा पेंडसे, कु. मालती चौधरी वगैरेंच्या गाण्यांनी रंग भरला.

ह्या 'सागरी सहल'ची फलश्रुती काय? परिणामांचा विचार करता एक गोष्ट उघडच आहे की अवघ्या आठ दिवसात समुद्राशी संबंधित विविध क्षेत्रात चालणाऱ्या कार्याची सखोल माहिती होणे शक्यच नाही. तसा कुणाचाच दावाही नाही. पण झालेल्या प्राथमिक परिचयामुळं सागराविषयी सखोल जाण असावी, हे औत्सुक्य मात्र निश्चितपणं निर्माण झालं. वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेल्या व वेगवेगळ्या स्तरांवरील लोकांशी भेट झाली. पैकी काहींचे विचार ऐकावयास मिळाले. अविस्मरणीय चित्तथरारक अनुभवसौख्य मिळाले. डॉ. रानडे, डॉ. अरुण वाघ वगैरे तज्ञांच्या भाषणांनी समुद्राविषयीचा दृष्टिकोन अधिक व्यापक व विविध-लक्षी व्हायला निश्चितपणं प्रेरणा मिळाली. एका वेगळ्या सहलीचे थ्रिल मिळाले. अजून काय हवे?

हेही तेवढंच खरं की एरवी मुंबईकराला सुद्धा मुंबईतल्याच पोर्ट ट्रस्ट; माझगाव डॉक्स; नेव्हल डॉक यार्डस्, फिशरीज कॉलेज, नॉटीकल कॉलेज वगैरे संस्था सर्व साधारण परिस्थितीत पाहावयास मिळणे दुरापास्तच-आहे. मग इतरांचं सोडाच ह्या पार्श्वभूमीवर ह्या शैक्षणिक उपक्रमाचे यश ठळकपणे जाणवते.

'सागरी सहल' संपल्यावर परतताना प्रत्येकाच्या मनात सर्वसाधारणपणं एकच विचार घोळत होता– ''युप्रस'चा पुढचा कार्यक्रम काय?' ह्यातच सारे आले.



पृष्ठ २ वरून

येण्याचं पहिलंच वर्ष. ११० लोकांचं ट्रेनिंग कॉलेजमध्ये गळ्यात हार, कपाळावर कुंकुम तिलक लावून केलेलं स्वागत. मला त्याचं त्यावेळी महत्त्व वाटलं नव्हतं, किंबहुना अच्युतराव त्यांच्या फ्रान्सवरील प्रेमानं 'जरा जास्तच' करताहेत हे असंच माझ्याप्रमाणे अनेकांना वाटलं. पण त्या एवढ्याशा गोष्टीनं, या मंडळींचं हृदय हाललं.

पहिल्या वर्षी हे लोक आले. दुसऱ्या वर्षी पुणेकर इकडे येणार अशी योजना. सरकारी परवानगीवाचून ते शक्य झालं नाही. तेव्हा १९६८ मध्येही फ्रेंच लोकच येणार असं ठरलं. १९६८ च्या विद्यार्थी चळवळीमुळे फ्रान्समध्ये सरकारी यंत्रणाच कोलमडली होती. १४० फ्रेंच लोक येणार ही बातमी पुण्याला ८।१० दिवस त्यांच्या येण्याआधी कळली. सर्वांनीच कंबरा कसल्या. त्याही गोष्टीची दाद इकडे नकळत घेतली गेली. आता मी विचार करते की ही मुलं एवढं प्रेमानं, अगत्यानं भारताकडे बघतात त्याच्या मुळाशी ही सातत्यानं काम करण्याची तिकडील मंडळींची चिकाटी आहे. १९६७ पासून ७० पर्यंत ४५० फ्रेंच मंडळी येऊन गेली. यांना कितीनं गुणावं ? तेवढी माणसं, जगाच्या पाठीवर भारत नावाचा सर्व गुणा-अवगुणांचा देश आहे एवढ्या माहितीची धनी झाली आहेत.

'भारताच्या सात वकिलांचं काम आपटे ही एक व्यक्ती करते आहे' असं मुंबई-तील फ्रेंच कौन्सुल एकदा म्हणाले होते. फ्रान्समध्ये आल्यापासून गावोगावी ही अशी तरुण मुलं-मुली भारताबद्दलचे गैरसमज दूर करण्याचा आटापिटा करताना पाहिलं की त्या कौन्सुलचं म्हणणं पटतं.

यामुळे आमचीही आणखी काही जबाबदारी वाढते. देशादेशांमधील संबंध सुधारण्याच्या दृष्टीनं सर्व राष्ट्रं आपापल्यापरीनं प्रयत्न करत आहेत. चीनची यूनो प्रवेशाच्या दृष्टीनं पाऊलवाट किती झपाट्यानं चाललीय आणि इतरत्रही हे मोल जाणून एकजुटीचे प्रयत्न, बंधुत्वाचे प्रयत्न चालल्याचं 'माणूस' मध्ये नुकतंच वाचण्यात आलं. अशा या योजनेत भारताचा आवाज अगदी क्षीण आहे याची जाणीव पावलापावलाला होते. आमचा इतिहास चांगला, आमची संस्कृती चांगली, आमची शिल्पं अजोड, आमचं संगीत-नृत्य समृद्ध, आमची हस्तकला मौल्यवान इतकं सगळं असताना आम्हाला ती सांगता येऊ नये, दाखवता येऊ नये याचा खेद वाटावा की विमान, टेलिव्हिजन, वृत्तपत्रांच्या लाभानंही भारतासारख्या एका अवाढव्य देशाबद्दलच्या यांच्या अज्ञानाची कीव करावी हे मला तर समजतच नाही.

२३-१२-७०

दरम्यान ६००।७०० कि. मीटर्स प्रवास, भेटीगाठी, २ लहान लहान गावात

स्लाइडस्सह चर्चा, प्रश्नोत्तरांचे कार्यक्रम झाले.

या दोन गावातील चर्चांच्या कार्यक्रमाला Guy Poitevin हे हजर होते. संस्थांचा (A. F. F. आणि समिती) परिचय, फ्रेंच लोकांचे भारतातील अनुभव वगैरे प्रस्तावना त्यांनी केली. प्रत्येक गावात सुमारे ५०।६० वृद्ध, तरुण स्त्री पुरुषांचे groups होते.

Guy माझ्याबरोबर अशा कार्यक्रमाला हजर असण्याचा पहिलाच प्रसंग. त्याचीच दिवसभर खूप तयारी चालली होती. India 1969, इतर काही वृत्तपत्रांच्या आधारे, आकडेवारीच्या सहाय्यानं, स्लाइडस्ची Commentary तयार करत होते. मी त्यांना म्हटलं सुद्धा एवढी काय काळजी करताहात ? मला पाठ झालय लोक काय प्रश्न विचारतात ते. पण त्याचं समाधान होईपर्यंत ते वाचन, तयारी करतच राहिले. रात्री १२ ला सर्वजण घरी आलो. श्रोत्यांचे शेरे आठवीत.

कालही असाच एका १० जणांच्या ग्रुपमध्ये कार्यक्रम झाला. ही सर्व तरुण मुलं धर्मांचा तौलनिक अभ्यास करताहेत. बुद्धिमान आहेत. रात्री घरी परतताना म्हणतात, ' भारताचे हे अवघड दिवस संपले तर हिंदुधर्माचं जीवनाचं तत्त्वज्ञान, जगाला या भौतिक धावण्यापासून वाचवेल. पूर्वेकडील या संस्कृतिसंपन्न देशाकडे काही काळानंतर जग आशेनं पहायला लागेल असं आम्हाला वाटतं. औद्योगिकरणाच्या मागे लागून तुम्ही हे सर्व विसरलात तर आम्हाला वाईट वाटेल ?

२४.१२.७०

सतत अशा या चर्चा चालू असतात. अर्थात् सर्व फ्रेंचमधून. महिना १॥ महिन्यांनी एखादा दिवस असा येतो की डोकं शीणून जातं. काल असंच झालं. हा थकवा चेहेऱ्यावर स्पष्ट दिसतोच की. Guy म्हणतात, " माफ करा हं. हे सर्वच काम शीण येणारं आहे. पण मला वाटतं या अशा संवादानंच आजपर्यंत भारताची जी ओळख आम्हा पाश्चात्यांना होऊ शकली नाही ती होणं सुलभ होत. आणखी काही जाणून घ्यायची उत्सुकता निर्माण होते. " मी म्हटलं, " माझं हे कामच आहे. त्याच महत्त्व पटलं आहे." तेव्हा थकण्याची सबब कधीच सांगत नाही मी.

आज नाताळचा सण. रात्री १२ वा. सामुदायिक प्रार्थना सर्व युरोपभर. घरात Sapin चा वृक्ष निरनिराळ्या भेटवस्तूंनी सजवला आहे. रात्री प्रार्थनेहून घरी आल्यावर या भेटी उघडायच्या असतात. मुलांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

आपल्याकडील दिवाळीची आठवण येते. जगभर तीच उत्सवप्रियता. येत्या सोमवारी दि. २८-१२ ला आम्ही चार मैत्रिणी एका छोट्या मोटारनं Dieppe-New Haven या मार्गानं लंडनला जातो आहोत. एक आठवडाभर. श्री. आप्पासाहेब पंतांना भेटावंसं वाटतंय. पहायचं कस काय होतंय ते. आता परतण्याचे वेध लागलेत.

□ □ □

मधुरगीतांनी बहरलेले
तुमच्या आवडत्या कलावंतांच्या अभिनयाने साकार झालेले मस्त चित्र..

फिलमकुंज (मुंबई) प्रा. लि. निर्मित रंगीत चित्र




निर्माता : जगदीशकुमार
दिग्दर्शक : मुकूल दत्त
संगीत : लक्ष्मीकांत–प्यारेलाल
गीते : आनंद बक्षी

भू. :– आशा पारेख, राजेश खन्ना, विनोद खन्ना, राजेन्द्रनाथ, मेहमूद ज्यू. सुजितकुमार, इंद्रायणी मुकर्जी, तरुण बोस व निरुपा रॉय.

अलंकार * रेक्स * अरोरा * सूर्य
२॥, ५॥, ९। ११॥, २॥, ६, ९। २॥, ६, ९। ११॥, २॥ ६, ९।

गणेश * कुमकुम * रिव्होली
११॥, २॥, ६ ,९। १०॥, २।, ५॥, ९। ११॥, २॥, ६, ९।

मीलन (सांताक्रूझ), ऑस्कर–नवरंग (अंधेरी), टोपीवाला (गोरेगांव), हंजर (जोगेश्वरी), जोहरा (मालाड), जया (बोरिवली), सहकार (चेंबूर), कल्पना (कुर्ला), श्रेयस (घाटकोपर), गणेश (मुलूंड), सपना (उल्हासनगर).

— जयसिंह प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. H-M 649




"आम्ही नाही मदत करू शकणार तुम्हाला.आम्ही आहोत सरकारी नोकर..."